गुरुवार, १२ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ६९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 12 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-69 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# महाराष्ट्राचा 'उडता पंजाब' करू नका

## नाना पटोले : राज्यकर्त्यांच्या आशीर्वादानेच ड्रग तस्करी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती : नाशिकमधले ड्रगचे लोण अमरावती सारख्या शहरातही पसरत आहे. शाळा, कॉलेजमधील मुलांना ड्रग्जच्या विळख्यात ओढले जात आहेत, हे अत्यंत गंभीर आहे. नाशिक ड्रग्ज प्रकरणाची जबाबदारी सरकारने स्विकारली पाहिजे. तरुणांचे आयुष्य बरबाद करणारा हा प्रकार थांबवणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचा उडता पंजाब करु नका असे आवाहन करत राज्यकर्त्यांच्या आशिर्वादाशिवाय ड्रग तस्करी अशक्य आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.**

प्रदेश काँग्रेसची आढावा बैठक अमरावतीमध्ये पार पडली त्यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष प्रसार माध्यमांशी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, ड्रग माफिया ललित पाटील याला ससून रुग्णालयातून फरार करण्यात कोणी मदत केली हे समोर येत आहे. ललित पाटील गायब कसा झाला ? त्याला सोडवण्याचा कोण प्रयत्न करत आहे, याची सर्व माहिती आमच्याकडे आहे, योग्य वेळी ती आम्ही जाहीर करू परंतु तरुणांच्या आयुष्याशी खेळणाऱ्यांना कोणीही पाठिशी घालू नये. असले प्रकार होऊ नयेत ही आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. नाशिकमधील ड्रग प्रकरण काही कालचे नाही ते आधीपासूनचे आहे, त्याला कोणा कोणाचा पाठिंबा आहे हे हळूहळू बाहेर येत आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा आढावा घेण्याचे काम सध्या सुरु असून आज अमरावती विभागातील जिल्ह्यांचा आढावा घेण्यात आला आहे. काँग्रेस पक्षावर जनतेचा विश्वास वाढत असून जनतेपर्यंत जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवणे याला प्राधान्य दिले जाणार आहे. उदयपूर शिबिरातील



निर्णयांची अंमलबजावणी कितीपत झाली याचाही आढावा घेतला जात आहे. जागा वाटपाच्या प्रश्नावर महाविकास आघाडीमध्ये चर्चा करुन निर्णय घेतला जाणार आहे. स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्या पक्षाने जागा लढवावी अशी मागणी करत असतात ते योग्यच आहे पण मेरिटनुसार जागा वाटपाचा निर्णय घेतला जाणार आहे. कोणत्या पक्षाला कोणता मतदारसंघ मिळेल यापेक्षा मविआच्या उमेदवाराला निवडून आणायचे आहे. लोकशाही व्यवस्था मान्य नसलेल्या भाजपाला सत्तेबाहेर काढणे हेच आमचे काम आहे. व्हायब्रंट गुजरातबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे लोक आहेत, शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी सुरतेला लुटले होते पण आजचे सत्ताधारी महाराष्ट्र लुटून सुरतेला देत आहेत.

सरकार मधले लोक गुजरातचे हस्तक आहेत हे त्यांनीच जाहीरपणे सांगितलेले आहे, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला. अमरावतीच्या आढावा बैठकीत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री तसेच प्रदेश उपाध्यक्ष सुनिल देशमुख, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे, आ. बळवंतराव वानखेडे, अमरावती ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष अनिरुद्ध ऊर्फ बबलुभाऊ देशमुख, अमरावती शहर काँग्रेस अध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, माजी महापौर विलास इंगोले अमरावतीचे प्रभारी नाना गावंडे आदी उपस्थित होते.



# आम्हाला खाऊ नको, शिक्षक द्या!

## शिक्षक गायब, पगार मात्र चालू

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** तालुक्यातील दोंदवाड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्या दोन वर्षांपासून एकही शिक्षक नसल्याने विध्यार्थ्यांची परिस्तिथी बिकट आहे. शिक्षणाधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या. परंतु, त्यांनी कोणतीही दखल न घेतल्याने अखेर बुधवारी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांसह जिल्हा परिषदेचे कार्यालय गाठले. यावेळी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळेकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाचा धिक्कार केला. तसेच विद्यार्थ्यांनी सीईओंची भेट घेत, 'आम्हाला खाऊ नको, शिक्षक द्या', अशी विनवणी केली. याची तातडीने दखल घेत सीईओ शुभम गुप्ता यांनी आठ दिवसांत शिक्षकाची नेमणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. ग्रामीण भागातील मुला- मुलींसाठी जिल्हा परिषदेच्या शाळा मोठ्या आधार ठरतात. परंतु, गेल्या काही दिवसांपासून शासनासह व प्रशासनाला मराठी शाळा जिवंत ठेवायच्या आहेत की नाही? असा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे. कारण अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या तुलनेत शिक्षकांची संख्या खुपच कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दोंदवाड गावातील मराठी शाळेतील शिक्षिका गेल्या चार वर्षांपासून बेपत्ता आहे. मात्र, दर महिन्याला या शिक्षिकेला दोंदवाड शाळेतून पगार अदा केला जातो, असा अजब कारभार सुरु असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. येत्या आठ दिवसांत शाळेला शिक्षक न दिल्यास यापेक्षा मोठ्या संख्येने येवून आंदोलन करू, असा इशाराही बिऱ्हाडे यांनी यावेळी दिला. याप्रसंगी दोंदवाड गावाचे ग्रा.पं. सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

# खड्डयांना हार घालत रवींद्र भगत यांचे कळंबोली वसाहतीमध्ये अनोखे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** पनवेल महापालिका क्षेत्रात कळंबोली वसाहतीमधील मुख्य व अंतर्गत भागात रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांच्या विरोधात येथील शेतकरी कामगार पक्षाचे स्थानिक माजी नगरसेवक रवींद्र भगत व त्यांच्या सहकाऱ्यांकडून खड्डेमय रस्त्यांना हार घालून अनोखे आंदोलन करून पनवेल महानगरपालिकेचा निषेध केला. कळंबोली वसाहतीमधील अनेक रस्त्यांना ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. याबाबत स्थानिक माजी नगरसेवक रवींद्र भगत यांनी पनवेल महानगरपालिकेला वेळोवेळी स्मरण पत्र देवून खड्डे बुजविण्यासंदर्भात मागणी केली होती. परंतु या मागणीला महानगरपालिकेने अजूनही दुर्लक्षितच ठेवले आहे, असा आरोप रवींद्र भगत यांनी केला आहे. नुकतीच कळंबोली वसाहतीसाठी महापालिकेने ३०० कोटींच्या कामांना मंजूरी दिली आहे. याचे श्रेय भाजपा घेत असेल तर रस्त्यावरील खड्डयांचे श्रेय देखील भाजपनेच घ्यावे असे सुद्धा रवींद्र भगत यांचे म्हणणे आहे.यावेळी त्यांच्या समवेत माजी नगरसेवक गोपाळ भगत व इतर पदाधिकारी, महिला आघाडी यावेळी उपस्थित होत्या.



# त्यांचे परतीचे दोर कापले : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली आणि एक गट भाजपाबरोबर सत्तेत सहभागी झाला. असे असूनही हे दोन्ही गट आतून एकच आहेत. पुढील काळात ते कधीही एकत्र येऊ शकतात, अशा चर्चा केवळ सर्वसामान्यांमध्येच नाही, तर अगदी राष्ट्रवादीच्याच कार्यकर्त्यांमध्ये असते. यावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सडेतोड भूमिका मांडली. ते बुधवारी (११ ऑक्टोबर) मुंबईत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसमोर बोलत होते. जयंत पाटील म्हणाले, बऱ्याच जणांना अशी शंका आहे की, हे दोन्ही गट परत एकत्र आले, तर कशाला डोक्याला त्रास. अशी शंका प्रत्येकाच्या मनात आहे. त्यामुळे आम्हीच सगळ्यांनी शपथ घेतली पाहिजे की, आम्ही एक होणार नाही. सगळ्यांना ही शंका असल्याने कशाला घाई, कळ काढा, असं कार्यकर्ते एकमेकांना म्हणतात. एक महिला कार्यकर्ती दुसरीला म्हणते की, तुला काही कळते का, ते आतून एकच आहेत. मी महिला कार्यकर्त्यांच्या मनातील बोलण्याचा प्रयत्न करत आहे. तसे काहीही नाही. आपला पक्ष वाढू नये म्हणून केलेली ही शक्कल आहे. आपला पक्ष वाढू नये म्हणून ही कुजबुज केली जात आहे. शरद पवार आपला पक्ष वाचवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन बसतात. यात सगळेच आले. कार्यकर्त्यांना यावरून काय प्रकार सुरू आहे हे सगळे लक्षात आले पाहिजे.

# बालम टाकळीचे युवक ज्योत आणण्यासाठी एकवीरा देवीकडे रवाना

## शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त बालंबिका देवी देवस्थान सज्ज


आधुनिक केसरी न्यूज

जयप्रकाश बागडे

शेवगाव : तालुक्यातील बालमटाकळी येथे महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठापैकी एक असणाऱ्या माहूरच्या रेणुका देवीचे श्री बालंबिका देवी हे जागृत देवस्थान असून शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त बालमटाकळी येथील शंभरहून अधिक तरुण युवक गेल्या अकरा वर्षापासून पायी ज्योत आणण्यासाठी महाराष्ट्रातील देवीच्या विविध जागृत स्थान असलेल्या रेणुका देवीचे माहूर, तुळजाभवानी तुळजापूर, लक्ष्मी माता कोल्हापूर, मांढरची मांढरदेवी, सप्तशृंगी देवी वनी, बालाजी येथील पद्मावती देवी येथुन नवरात्र उत्सवासाठी पायी मशाल ज्योत घेऊन आले आहेत. यावर्षी देखील बालमटाकळी ते एकविरा देवी लोणावळा मुंबई येथून तीनशे किलोमीटरचा प्रवास करून ते पायी ज्योत आणण्यासाठी आज बुधवारी सकाळी दहा वाजल्याच्या सुमारास किमान शंभराहून अधिक युवक तरुण वाहनाच्या साह्याने बालंबिका देवी मंदिरात आरती करून वाजत गाजत देवीचा गजर करीत भाविकांनी




प्रस्थान केले असून ग्रामस्थांनी सुखकर प्रवासासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील बालमटाकळी येथे शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त बालंबिकादेवी मंदिर ट्रस्टच्या व ग्रामस्थांच्या वतीने भाविकांना देवीचे दर्शन व तांबूळ विडा व उपवासासाठी दररोज साबुदाणा खिचडी प्रसाद म्हणून दरवर्षीप्रमाणे मिळण्यासाठी सुलभ व्यवस्था केली असून नवसाला पावणारी व हाकेला धावणारी देवीची ख्याती असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक लोक या देवीच्या दर्शनासाठी आवर्जून नवरात्र उत्सवात येत असतात. देवीचा मनमोहक असा तांदळा व मंदिराचे भव्य दिव्य, असे बांधकाम गावच्या विकासाचा एक केंद्रबिंदू बनला आहे. शारदीय नवरात्रोत्सवात दिनांक 17 ते 22 सप्टेंबर पर्यंत महिलांचे कीर्तन महोत्सव ठेवण्यात आला आहे. दिनांक 17 सप्टेंबर रोजी सायंकाळी 9 वाजता ज्ञानेश्वरीताई जगताप बोधेगावकर, ह.भ.प. योगिताताई देवकर पैठण, मीनाताई मडके गदेवाडी भक्ती ताई तेलोरे, ह.भ. प. अभीतीताई माने, दिनांक 22 रोजी सकाळी दहा ते बारा ह.भ.प. साध्वी शितलताई देशमुख बालमटाकळीकर यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन होणार आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

सोडून आसन उठले राघव, उठुनि कवळती अपुले शैशव पुत्रभेटीचा घडे महोत्सव, परी जो उभया नच माहिती. अशी जादू जणू हे शब्द करतात ! मग ते शब्द वाल्मिकींचे असोत वा गदिमांचे. ती अमूर्त अक्षरे ध्वनीचे रूप घेऊन कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. आनंदाच्या चांदण्याची बरसात होते. कर्तव्यकठोर असलेल्या श्रीरामांचे देखील डोळे पाणावतात. माया, ममता, प्रेम, करुणा सगळे सगळे भाव हे शब्द उभे करतात. असं म्हटलं जातं की प्रख्यात जर्मन कवी गटे यांनी कालिदासाच्या शाकुंतल या नाटकाचं जर्मन भाषेत केलेलं भाषांतर जेव्हा वाचलं, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की हा जर्मन कवी आपलं देहभान विसरून शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला. कुठून आला हा आनंद ? पुस्तकाच्या वाचनातूनच ना ? या आनंदाला उपमा नाही आणि त्याची तुलना इतर कुठल्या आनंदाशी होऊ शकत नाही. त्या काळात पाश्चात्य साहित्यात सौंदर्यवाद मूळ धरू लागला होता. अशा काळात कालिदासाने लिहिलेलं शकुंतलेचं आणि निसर्गाचं वर्णन वाचून हा कवी अक्षरशः वेडा झाला. त्याने त्यावेळी शाकुंतल या ग्रंथाबद्दल काढलेले उद्गार असे आहेत. ' वसंतऋतूतला मोहोर आणि ग्रीष्म ऋतूतलं फळ हे सर्व एकाचवेळी ( युगपद् ) ज्यात आहे, जे ( एकाच वेळी ) मनाला शांत करणारे ( संतर्पणम् ) आणि मोहितही करणारे आहे. किंवा स्वर्ग आणि पृथ्वी यांचं ऐश्वर्य जर एकाच वेळी एकत्र हवं असेल तर प्रियमित्रा, तू शाकुंतलाचा आस्वाद घे. ' मला वाटतं हेच उद्गार सर्व ग्रंथांना लागू होतात. ज्ञानेश्वर माऊलींची माफी मागून त्यांच्या भाषेत मला असे सांगावेसे वाटते ग्रंथ सर्व रसांचा आगरु, ग्रंथ सर्व सुखांचा सागरु तरी ग्रंथ हाती घेईजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे. जशी प्रेशर कुकरमध्ये कोंडलेली वाफ बाहेर पडणे आवश्यक असते त्याचप्रमाणे आपल्या मनात साठलेल्या भावनांचे सुद्धा मुक्त होणे, निचरा होणे किंवा ज्याला आपण विरेचन असे म्हणू तेही आवश्यकच असते. पुस्तके आणि त्यांचे वाचन अशा प्रकारचे भावनांचे विरेचन ज्याला इंग्रजीत कॅथर्सिस म्हटले जाते ते घडवून आणतात. मी वाचकही आहे आणि लेखकही. माझा तर श्वास म्हणजे वाचन ! मी जेव्हा आनंदी असतो तेव्हा एखादे आवडते पुस्तक हातात घेतो आणि माझा आनंद दुणावतो. मी जेव्हा दुःखात असतो तेव्हाही एखादे पुस्तक हातात घेतो आणि माझे दुःख उणावते. थोडक्यात म्हणजे गणपतीच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे चांगल्या पुस्तकांचे वाचन हे ' सुखकर्ता दुःखहर्ता ' अशा प्रकारचे आहे.



## आनंदी पहाट



# अतिथी व्याख्यात्यांचा शिक्षणातील सहभाग मोलाचा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक गरजा आणि अत्यावश्यक बदलांमुळे शिक्षणाचे जग प्रचंड बदलत आहे. सध्याच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी पारंपारिक शिक्षण पद्धती बदलणे आवश्यक आहे; जे सुमारे एक किंवा दोन दशकांपूर्वीच्या गरजांपेक्षा भिन्न आहे. लक्ष वेधण्याचा कालावधी आणि विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे आकलन करण्याची पद्धत देखील

काही काळापासून बदलत आहे. शैक्षणिक संस्थांमधील सर्वात प्रभावी आणि सदाबहार पद्धतींपैकी एक म्हणजे अतिथी व्याख्याने होय. अतिथी व्याख्यात्यांच्या व्याख्यानांचे असंख्य फायदे असतात. ते विद्यार्थ्यांना वेगळ्या दृष्टीकोनातून आणि अधिक प्रभावीपणे शिकण्यास मदत करू शकतात. विशेषतः व्यवस्थापनाच्या अभ्यासात विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगताचे अनुभव चाखायलाच हवेत. एक प्राध्यापक व्यावसायिक जगतात प्रत्येक, सर्वच गोष्टीबद्दल ज्ञान आणि मार्गदर्शन देऊ शकतोच असे नाही. उद्योग व्यावसायिकांचे विविध दृष्टीकोन, त्यांचे स्वतःचे

प्रत्यक्ष कार्यरत असताना त्यांना मिळालेले अनुभव विद्यार्थ्यांना अंतर्दृष्टी देतात. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यात्यांना आमंत्रित केल्याने विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि शैक्षणिक संस्थांसाठी फायदेच होतात. सर्व वयोगटातील आणि अनुभवाच्या स्तरांचे विद्यार्थी विविधतेसाठी भुकेलेले असतात आणि संस्थेत आपल्या समोर नवीन चेहरा पाहिल्याने वातावरणात जाज्वल्य येते प्रत्येक विषय आणि विचार देखील जिवंत होऊ शकतो; अतिथी व्याख्याता बोलाविण्याची सखोल शैक्षणिक कारणे देखील अभ्यासपूर्वक समजून घेतली पाहिजेत. आपल्यापैकी कोणीही प्रत्येक गोष्टीत तज्ज्ञ नाही, म्हणून एखाद्या विषयात सिद्ध कौशल्य असलेले व्याख्याते आमंत्रित करणे संस्थेच्या व्यवस्थापनाला, सामग्रीला, शिक्षण पद्धतीला अधिक विश्वासार्हता प्रदान करते. हे तज्ज्ञ कदाचित एकाच संस्थेतील प्राध्यापक असू शकतात किंवा शिक्षण क्षेत्रातील, शैक्षणिक समूहातील आणि समुदायातील तज्ज्ञ असू शकतात.



आधुनिक केसरी

**सासर माहेर | एक झाले ||**
वाहुनिया भार | झालो मी निश्चिंत ||
आता कैसी खंत | पांडुरंगा ||१||
कर्म झाले माझे | कर्तव्याचे घर ||
संसारी सासर | सुखी झाले ||२||
रज तम गुण | टाळूनी विकार ||
केला रे स्विकार | सत्वगुणी ||३||
ज्ञानाईच्या संगे | तुकोबा गावला ||
संसारचि झाला | विठुमय ||४||
संत संग होता | मिटले अंतर ||
सासर माहेर | एक झाले ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


|| इति श्रीगुरोराज्ञया चन्द्रहासविरचितं सकल-कल्याण-कारकं श्रीदुर्गादेवीनमनं सम्पूर्णम् ||
|| अशा प्रकारे, श्रीगुरूंच्या आज्ञेने चंद्रहासविरचित सर्वांचे कल्याण करणारे असे श्रीदुर्गादेवीनमन पूर्ण झाले.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

भुले हुए जग जीव को, निज घर दे पहुँचाय ।
सत्पथ पर दर्शक रहे, सद्गुरु देव कहाय
।।३२।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/३२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जे प्रकृति रूपी वनातील भरकटलेल्या जीवांना सत्यमार्ग दाखवून चेतन निजघरी अमरलोकात पोहोचवून देतात त्यांनाच सद्गुरू देव म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४७वे

श्रीमहाराजांचा निष्ठावान भक्त
नाव होते त्याचे भिकाजी श्रीपत
बतशा घोडा स्वतःचा असलेला
श्रीमहाराजांना हो अर्पण केला ।।
छान सुंदर असा बताशा घोडा
अंगात होत्या याच्या बऱ्याच खोड्या
इतर कुणा कधी दाद ना देई
महाराज दिसता शरण जाई ।।
बताशा घोडा महाराजांना आवडे
इतरांचे बसणे घोड्यास वावडे
बसला कधी कुणी त्यावरी जरी
करुनी धिंगाणा खाली त्याला पाडे ।।
शाहूरावने महाराजांचा होकार
गृहीत धरून बताशाला नेला
असे सहन नाहीच झाले त्याला
अश्रू ढाळीत तो उपाशी राहिला ।।
मुकाट्याने शाहूराव गोंदवले आले
घोड्यास महाराजांच्या स्वाधीन केले
पाहुनी प्रेम अलौकिक हे आगळे
भक्त आता बताशाला वंदू लागले ।।
लिहिता अशी भक्ती रसाळ गाथा
श्रीमहाराजांच्या चरणी नमवितो
कवी अरुणदास त्याचा हो माथा ...




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# प्रपंच केवळ कर्तव्यकर्म म्हणून करा


आधुनिक केसरी

एका माणसाला विडी ओढण्याचे फार व्यसन होते. तो आजारी पडल्यावर त्याने डॉक्टरांना सांगितले, "मला तुम्ही औषध दिले तरी मी विडी सोडणार नाही." त्याचा डॉक्टर फार हुशार होता. त्याने त्याला एक गोळी देऊन, विडी ओढण्यापूर्वी ती तोंडात धरीत जा म्हणून सांगितले. त्या गोळीमुळे विडीच्या तंबाखूचे विष त्याला बाधत नसे. तसे आपण प्रपंच करताना वागले पाहिजे. प्रपंच आम्हांला सुख देईल ही आमची कल्पनाच नाहीशी झाली पाहिजे. म्हणजे प्रपंचाची हावही कमी होईल, आणि नंतर कर्तव्यापुरतेच आम्ही प्रपंचात राहू. जोपर्यंत प्रपंचाकडे आमची दृष्टी आहे तोपर्यंत आम्हाला समाधान कालत्रयीही मिळणे शक्य नाही. प्रारब्धाने प्रपंच आला आहे, तो कर्तव्यकर्म म्हणून करीत जा, पण त्यात सुख मिळणार आहे या कल्पनेने तो करू नका. प्रपंची लोकांचा स्वभाव फार विचित्र आहे; त्यांना खरे सांगितले तर ते आवडत नाही. वास्तविक आपण प्रपंचातले संबंधी लोक कामापुरते एकत्र जमलो आहोत. ज्याप्रमाणे आगगाडीत पुष्कळ प्रवासी



एकत्र जमतात, त्याप्रमाणे प्रपंचात आपण एकत्र जमतो. पाचजण मिळून प्रपंच बनतो. त्यामध्ये प्रत्येकजण स्वार्थी असतो. मग सुख एकट्यालाच मिळणे कसे शक्य आहे ? नुसता प्रपंच तापदायक नाहीं, आकुंचित प्रपंच तापदायक आहे. आपले खरे समाधान भगवंताजवळ आहे ही खूणगाठ पक्की बांधून प्रपंचात वागा. ज्याप्रमाणे व्यापारात नफा व्हावा म्हणून व्यापार करतात, तो होत नसेल तर व्यापारात काहीच तथ्य नाही, तसेच प्रपंचात समाधान हा नफा आहे; तो जर मिळत नसेल तर प्रपंचाचा लोभ धरण्यात काय फायदा आहे ? "तुझ्या असमाधानाचे कारण नक्की सांग," असे जर आपण एखाद्याला विचारले, तर त्याला खात्रीलायक कारण सांगता येणार नाही. याचा अर्थ असा की, तत्त्वदृष्टया समाधान व्हायला खरोखरीच कशाची जरूरी नाही; पण ही गोष्ट कुणाला पटत नाही. आहे त्या अवस्थेमध्ये आपले समाधान टिकत नाही, आणि पाहिजे ती वस्तू मिळाली तरी आपण पूर्ण सुखी होत नाही. कैदेतल्या माणसाला 'मी सुखी आहे' असे वाटणे कधी शक्य आहे का ? तशी प्रपंची माणसाची अवस्था आहे. खरोखर, प्रपंचात समाधान, आनंद, मिळत नाही हे अगदी सर्वांना कळते; परंतु शहरातले लोक केवळ अभिमानामुळे, आणि खेडयातले लोक अज्ञानामुळे, जसे वागायला पाहिजे तसे वागत नाहीत. या प्रपंचात राहूनसुद्धा भगवंताचे प्रेम आणि समाधान आम्हांला कसे मिळविता येईल, याचा आपण आधी विचार करायला पाहिजे. नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम आपोआप नष्ट होईल, आणि मग देहाने मांडलेल्या प्रपंचावरचेही प्रेम कमी होईल, आणि पुढे त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल.

## गहिनीनाथ



तसेच संपूर्ण देवांच्या समक्ष त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला हा समराधनेचा समारंभ एक महिनाभर सतत चालला होता. मग गोरक्षानें कुबेरास सांगितलें कीं, तूं हा सुवर्णाचा पर्वत घेऊन जा आणि ह्याच्या मोबदला आम्हांस अमोल वस्त्रें-भूषणें दे; म्हणजे तीं सर्व मंडळीस देऊन रवाना करतां येईल. हें भाषण ऐकून कुबेरानें येथील धन येथेंच असूं द्या. आज्ञा कराल त्याप्रमाणें वस्त्रालंकार मी घेऊन येतों. मग त्यानें वस्त्रांचीं दिंडें व तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ अलंकार आणून दिले. तीं वस्त्रें भूषणें सर्वांना दिलीं; याचकांना द्रव्य देऊन त्या सर्वांच्या इच्छा तृप्त केल्या व मोठया सन्मानानें सर्वांची रवानगी करून दिली. समारंभ झाल्यावर उपरिक्ष वसूसमागमें मीननाथास सिंहलद्वीपास त्याच्या तिलोत्तमा मातोश्रीकडे पाठवून दिले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १२ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मराठा आरक्षणासाठी समाजबांधवांनी एकजूट दाखवावी

## मनोज जरांगे : आरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात; विजय मराठ्यांचाच होणार

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** मराठा समाजाने आरक्षणाचा लढा योग्य मार्गाने न दिल्याने आजही आरक्षणाच्या हक्कापासून वंचित आहे. म्हणून आज आरक्षणासाठी लढा दयावा लागतोय. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च पदावरील अधिकारी झालेले पहाण्यासाठी सकल मराठा समाजाने मतभेदाला मूठमाती देऊन आरक्षणासाठी समाज बांधवांनी एकजूट दाखवावी असे आवाहन मनोज पाटील जरांगे यांनी सकल मराठा समाजाला केले. राजूर येथील जाहीर सभेत मराठा समाजाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की मराठा समाज आता एकवटला असून अहोरात्र परिश्रम घेऊन उन्हातान्हाची पर्वा न करता आपल्या कुटूंबासह आरक्षणाच्या लढयात उतरल्याने माझा आत्मविश्वास वाढला आहे.आता आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.आरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात असून या लढ्यात विजय मराठयांचाच होणार आहे. त्यासाठी समाजबांधवांनी एकजूट दाखवून या आंदोलनात सर्वांनी सामील होण्याचे आवाहनही त्यांनी केले. मनोज जरांगे पाटील यांच्या संवाद यात्रेस सर्वत्रउत्तम प्रतिसाद मिळत असून राजूर येथील सभेसही परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमास शालेय विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती दिसून आल्याने जरांगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.आरक्षणाचा खरा लाभ तुम्हाला मिळवून देण्यासाठी हा लढा उभारला असल्याचेही त्यांनी सांगितले.

सकल मराठा समाजाने आंदोलन उग्ररुप धारण करणार नाही याची दक्षता घ्यावी.लोकशाहीच्या मार्गाने व शांततेत आपणास आरक्षणाचा लढा सुरू ठेवायचा आहे.कोणीही जाळपोळ किंवा हिंसक आंदोलन करू नये असे आवाहन त्यांनी समाज बांधवांना केले .येत्या 14 ऑक्टोबरला अंतरवाली सराटी येथील सभेला सकल मराठा समाजाने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रमस्थळी मुस्लिम बांधवांकडून पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.फोटो ग्राफर संघटनेने मोफत सेवा देत कार्यक्रमाचे चित्रीकरण केले.मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत मराठा समाज बांधवांनी आरक्षणाची शपथ घेऊन कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

मनोज जरांगे पाटील यांचे राजुर येथे आगमण होताच फटाक्यांच्या आतिषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. जेसीबींमधुन त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. मुख्य मार्गावरुन त्यांनी मंदीरावर जावून श्रीराजुरेश्वराचे मनोभावे दर्शन करुन महापुजा केली. यावेळी त्यांच्यासोबत मराठा समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांचा श्रीगणपती संस्थान, ग्रामस्थ, व्यापारी व मराठा बांधवांच्या वतीने श्रीची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला



**मुलींच्या भाषणांनी सर्वांचे लक्ष वेधले :** श्रीक्षेत्र राजुर येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आगमनापूर्वी शाळेच्या विद्यार्थीनींनी मोठ्या उत्साहात व आवेशपूर्ण भाषणे केली .आरक्षण नसल्याने शैक्षणिक नुकसान होते हे पटवून दिले .मुलींच्या भाषणांना उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला .या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रतिक्षा काकडे हिने केले असून वेदिका कदम, भक्ती फुके, गायत्री गोरे, भक्ती हिरगुडे, पूजा शेजुळ, भाग्यश्री कढवणे, ऋतुजा शिरसाठ, संगीता मसरूप , पवन भवर आदींनी मनोगत व्यक्त केले आहे .



# मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र : समितीच्या कामकाजात जात नोंदींच्या पुराव्याबाबत चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यासाठी गठित केलेली समितीची बैठक आज छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. 'मराठा कुणबी, कुणबी मराठा' या जात नोंदींचे सबळ पुरावे ठरणारी कागदपत्रे, पुरावे निश्चित करण्यासंदर्भात या कामकाजात सविस्तर चर्चा झाली. समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) तसेच समितीचे सदस्य सचिव तथा विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, पोलीस आयुक्त मनोज लोहिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, विधी व न्याय विभागाचे सह सचिव सुभाष कराळे, उपसचिव विजय पवार, उपायुक्त जगदीश मिनियार, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, विभागीय आयुक्त कार्यालयातील विशेष कक्ष प्रमुख शिवाजी शिंदे तसेच विभागातील सर्व जिल्ह्यांचे निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख आदी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी समितीचे अध्यक्ष व सदस्यांचे ग्रामगिता हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. विभागीय आयुक्त अर्दड यांनी विभागात आतापर्यंत कागदपत्रांच्या तपासणीची माहिती सादर केली तर अपर जिल्हाधिकारी लोखंडे यांनी जिल्ह्यात झालेल्या कागदपत्रे तपासणीची माहिती दिली. त्याच बरोबर समितीने भूमि अभिलेख विभाग, कारागृह विभाग, नोंदणी विभाग या सर्व विभागांकडील नोंदींबाबतही माहिती घेतली. उर्दू, मोडी लिपीतील नोंदींबाबत संबंधित जाणकारांची मदत घेण्यात यावी,असेही निर्देश देण्यात आले. सकाळच्या सत्रातील कामकाजानंतर जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्याकडील उपलब्ध जुने पुरावे, कागदपत्रे समितीकडे सादर करण्यासाठी वेळ देण्यात आली होती. यावेळी नागरिकांकडील पुरावेही समितीने जाणून घेतले.

# मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेणार : प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** देशाचे कर्तव्यदक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतील आणि या निवडणुकीत मावळ लोकसभा मतदार संघातील आपल्या महायुतीचा उमेदवार सर्वात जास्त मतांनी विजयी होईल, असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज (दि. ११ ) येथे व्यक्त केले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीकरिता संपूर्ण देशभरात महाविजय २०२४ अंतर्गत लोकसभा मतदार संघाची बांधणी सुरू आहे. आगामी निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय पातळीवर ४०० प्लस तर महाराष्ट्र राज्यात ४५ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट केले आहे.त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदार संघात प्रवास सुरू आहे.त्यातील एक भाग असलेल्या ३३ मावळ लोकसभा मतदार संघातील आणि रायगड जिल्हयात येणाऱ्या पनवेल, उरण, कर्जत विधानसभा मतदार संघाचा कार्यक्रम पनवेल येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खा. रामशेठ ठाकूर, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष बाळा भेगडे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, पदाधिकारी उपस्थित होते.

# बल्लारपूर शहरांत दुकानाचे नाव मराठी पाट्या व मराठीत उल्लेख करण्यात यावे

## शहर प्रमुख मनसे उमेशभाऊ कुंडले यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** सर्वोच्चन्यायल यांनी नुकतेच महाराष्ट्र राज्य सरकार यांना आदेश दिला आहे. की महाराष्ट्र राज्यात दुकानावर मराठी भाषेत पाटी लावाने अनिवार्य आहे.. बुधवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी बल्लारपूर मनसे पक्षा कडून बल्लारपूर नगरपरिषद मुख्यधिकारी श्री विशाल वाघ साहेब यांना चर्चा करून शहरात दुकानावर मराठी पाटी लागणे नियमानुसार आवश्यक आहे, अशी मागणी केली आहे. की आपण आपल्या शहरातील दुकानाना पालिके कडून परिपत्रक काडून नोटीस बजवावी हफ्त्या भरात यांचा अंबलबजावणी करण्यात येणार आहे. अशी ग्वाही नगरपरिषद मुख्यधिकारी श्री विशाल वाघसाहेब यांनी दिली निवेदन देतांना उपजिल्हा प्रमुख विष्णूभाऊ बुजोने, उमेशभाऊ कुंडले शहर प्रमुख बल्लारपूर, मनसे राजू कोतपलीवार, प्रशांत बानकर, संतोष अवथरे उपस्थित होते.

प्रवेश देणे चालू आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित
गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल
शंकुतला ANM नर्सिंग स्कूल
प्रवेश देणे चालू आहे.

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| G N M | 40 | 3 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |
| A N M | 20 | 2 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |

वैशिष्ट्ये
› सुसज्ज इमारत
› तज्ञ प्राध्यापक वृंद
› मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
› मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागु आहे.(SC,ST)
› नौकरीची 100% गॅरंटी
› प्रक्टिकलसाठी 100 खाटाच्या हॉस्पिटलशी संलग्न

मोफत प्रवेश...!
नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड
Mob. 8766028429, 9922036771, 9595614111

## लखनऊमध्ये ड्रामा

आधुनिक केसरी

देशभरात सध्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची जोरदार चर्चा चालू आहे. निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केल्यानंतर या राज्यांमध्ये सर्वच पक्षांनी प्रचारासाठी कंबर कसली आहे. एकीकडे या घडामोडी चालू असताना दुसरीकडे उत्तर प्रदेशमध्ये सत्ताधारी भाजपा व विरोधी पक्षात असणाऱ्या समाजवादी पक्षात आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगले आहे. दोन्ही पक्षांमध्ये निर्माण झालेला वाद इतका टोकाला गेला की अखिलेश यादव यांनी चक्क जेपीएनआयसीच्या कम्पाऊंडवरून उडी मारून आत प्रवेश केला. यानंतर त्यांनी राज्यातील योगी आदित्यनाथ सरकारवर परखड टीकाही केली. लखनौमधील जेपीएनआयसी अर्थात जयप्रकाश नारायण इंटरनॅशनल सेंटरबाहेर आज मोठा गदारोळ झाला. जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीनिमित्त सपाचे काही नेते व कार्यकर्ते पोहोचले होते. त्यात उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादवही होते. जयप्रकाश नारायण यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी सपाचे नेते व कार्यकर्ते केंद्रात जाण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, त्यांना बाहेरच अडवण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव आत जाण्याची परवानगी पोलिसांकडून नाकारण्यात आली. अखिलेश यादव यांचे वडील दिवंगत मुलायमसिंह यादव यांच्या पुढाकाराने या केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. पोलिसांना विनंती करूनही आत जाण्याची परवानगी न मिळाल्यामुळे अखेर अखिलेश यादव यांनी थेट केंद्राच्या कम्पाऊंडवरून उडी मारून आतमध्ये प्रवेश केला. त्यांच्या पाठोपाठ सपाचे इतरही काही नेते व कार्यकर्ते अशाच प्रकारे कम्पाऊंडवरून उड्या मारून आत गेले. अखिलेश यादव यांनी या सगळ्या प्रकारावरून सत्ताधारी भाजपा व मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर आगपाखड केली आहे. मला थांबवण्यासाठी त्यांनी इथे पोलीस तैनात केले हे पाहून वाईट वाटले. पोलीस अधिकाऱ्यांनाच माहिती नाही की यासंदर्भात कुणाला विचारायचे. मला नेमके कोण थांबवतंय हे जनतेला कळायला हवे. हे लोकांचा आवाज दाबत आहेत. तुम्ही जयप्रकाश नारायण यांच्या आयुष्यावर आधारित संग्रहालय बंद करत आहात. तुमचे कोणते अपयश तुम्ही लपवण्याचा प्रयत्न करत आहात? फक्त संग्रहालयच नाही, पण इथली इमारतही बंद करत आहात, असे अखिलेश यादव यावेळी म्हणाले. अखिलेश यादव मुख्यमंत्री असताना जेपीएनआयसीचे ११ ऑक्टोबर २०१६ रोजी उद्घाटन झाले होते. २०१७मध्ये भाजपा सत्तेत आली. जेपीएनआयसीची इमारत बांधण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्याची एक विनंती योगी आदित्यनाथ यांच्याकडे करण्यात आली.

## सेना, राष्ट्रवादी फुटली त्यात भाजपचा दोष काय ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या वर्तमान राजकारणात दिड वर्षापुर्वी मुळची शिवसेना फुटली. तदनंतर शरदचंद्रजी पवार संस्थापक असलेल्या राष्ट्रवादी पक्षात उभी फुट पडली. मात्र राजकारणाचा भाग म्हणून पक्षांतर्गत संघर्षाला सामोरे जाणारे भाजपच्या नावाने ऊर बडवुन घेताना दिसतात. या फुटाफुटीच्या राजकारणात भाजपाचा दोष तिळाएवढा नाही. विस्तारवादी राजकारणात कुणी सोबत आले तर तो आदर्श लोकशाहीचा भागच म्हणावा लागेल. प्रश्न असा आहे लग्न झालं अनेक वर्षे संसार सुरू झाला. पण जेव्हा मुलंच होईना त्याचा दोष शेजाऱ्यावर कसा जावु शकतो? असंच काही स्पष्टपणे म्हटलं तर चुकीचं नाही. शिवसेना फुटली, राष्ट्रवादी फुटली. फोडाफोडीच्या राजकारणाला भाजप जबाबदार असं म्हणत अनेकांचा सुरू असलेला टाहो केविलवाणाच म्हणावा लागेल. प्रत्येक पक्ष नेतृत्वाने आत्मचिंतन केलं तर आपण कुठे कमी पडलो? दोष स्ापडू शकतो.**

मग शेजाऱ्याला जबाबदार धरण्याची गरज नक्कीच वाटणार नाही. आपला देश लोकशाहीचा पुरस्कर्ता असुन प्रत्येकाला आपलं मत, आपला पक्ष, आपला विचार चालवण्यासाठी मुक्त स्वातंत्र्य घटनेनच मिळालेलं. राजकारणात अनेकदा आपआपल्या स्वअस्तित्वासाठी काही पुढारी स्वतंत्र पक्ष काढतात आणि जे पेरलं तेच उगवल्यानंतर त्याचा सामना करायला असमर्थ होतात तो भाग वेगळा. शरदचंद्र पवार राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये होते. तीन दशकापुर्वी त्यांनी स्वतःचा पक्ष काढला तर दुसरीकडे स्व.बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेनेची केलेली स्थापना ज्यांचा विचार प्रखर हिंदुत्ववादाचा होता. भाजपा हा हिंदु रक्षण आणि राष्ट्रहिताच्या विचारधागेतुन पुढे आलेला पक्ष. मागे वळुन पहाताना पवारांचा राष्ट्रवादी ज्यांनी राष्ट्रीय पक्षाची साथ सोडली आणि स्वतःच्या राजकारणासाठी पक्षाची निर्मिती करून राष्ट्रवादीची स्थापना केली. एकेकाळी पुलोद माध्यमातुन देखील वर्चस्व दाखवले. मग वसंतदादा पाटलांच्या सोब्ात केलेली हातचलाखी असेल किंवा इतर गडबड. बाळासाहेबांची शिवसेना आणि विचार वारसदार म्हणून पुत्र उद्धवजी ठाकरे काम करण्यासाठी पुढे आले. शिवसेना आणि भाजप यांची महायुती तब्बल बावीस वर्षे कारण उद्देश आणि दृष्टी एकच होता पण ती दृष्टी स्व. बाळासाहेब ठाकरेंच्याकडे असल्याने रूसवे-फुगवे झाले पण नाते टिकुन राहिले. उद्धवजीच्या हातात सुत्रे आल्यानंतर स्वअस्तित्वाचा त्यांनाही पाना फुटला. अनेकदा 2014 च्या लोकसभेपासुनच खऱ्या अर्थाने दात दाखवायला सुरूवात केली होती. पक्षाचा विचार आणि तत्व जेव्हा मतदारांच्या मनावर घट्ट झालेले असतात तेव्हा ती राजकिय ताकद कुणीच रोखु शकत नाही. 2019 ला राज्यातील मतदारांनी महायुतीला मजबुतीने निवडुन दिले. अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नावाने शिवसेनेचं भलं झालं असं म्हणायला हरकत नाही. पण राज्याच्या राजकारणात उद्धवजी ठाकरेंनी केवळ मुख्यमंत्री पदासाठी बारामतीचा मळा गाठला. स्वमती समुद्रात फेकुन सत्तास्थानासाठी भाजपाला बाजुला केलं. खरं तर हा मतदारांचा अपमानच म्हणावा लागेल. जो 19 ला जनादेश मिळवुन देखील शिवसेनेने केला. जास्त इतिहास सांगत बसण्यापेक्षा जैशी करणी वैशी भरणी उक्तीप्रमाणे अडीच वर्षे उद्धव ठाकरे यांनी सरकार चालवलं. गंमत बघा, कुठल्याही राजसत्तेत कंसाच्या रूपाने कुणी भुमिका घेत असेल किंवा शकुनी मामाच्या भुमिकेत कुणी असेल तर सत्तेवर बसलेले महामहिम धृतराष्ट्राच्या भुमिकेत काम करतात. तसंच काही शिवसेनेचे झालं. संजय उवाच म्हणत अडीच वर्षाचा कारभार ज्यासाठी हिंदुत्व अगदी समुद्रात फेकुन दिलं. मतासाठी लांगुनचालन करताना नको ते निर्णय घ्यावे लागले. राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसच्या इशारावर नाचावं लागलं. कारण महाविकास आघाडी त्यांच्या सहकार्याने स्थापना झाली. हे सर्व करताना स्वतःच्या आमदाराला मुख्यमंत्री म्हणुन वेळ देता आला नाही. परिणामी वैतागुन स्फोट झाला आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रूपाने तब्बल 40 आमदार बाहेर पडले. या ठिकाणी प्रश्न असा पडतो की एखादा दुसरा आमदार बाहेर पडला तर आपण समजुन घेवु पण एकुण आमदारापैकी 90 टक्के आमदार बाहेर पडतात तेव्हा स्वतःचं आत्मचिंतन करण्याची गरज नक्कीच वाटते. राष्ट्रवादी पक्षाचं देखील तसंच म्हणावे लागेल. शरदचंद्रजी पवार यांचं मुरब्बी राजकारण देश अनुभवतेय. त्यांच्या पोटात एक आणि ओठात एक. एवढेच नव्हे तर राजकारणासाठी वाटेल त्या प्रयोगाचा सामना ते करतात. मागच्या अनेक वर्षापासून सत्तेत नसलेल्या पवारांना कुटुंब सांभाळता आलं नाही असा अंदाज आज निश्चित काढता येईल. स्वतः राजकिय फायद्याच्या भुमिका घ्यायच्या पण अनुयायांना हुकुमशाही पद्धतीने वागवायचं. हे आम्ही लेखणीत म्हणत न्ाहीत तर आज निवडणुक आयोगाच्या दालनात किंवा न्यायालयात वादे प्रतिवादे सुरू आहेत. त्यात त्यांच्यावर हुकुमशाही पद्धतीने पक्ष चालवला हा ठिपका अजितदादा गटाने ठेवला. प्रसंगी मुख्यमंत्री पदाची संधी येवुन देखील अजितदादांना ही संधी नको पण भाजपसोबत जायला राष्ट्रवादीची तयारी. या भुमिकेत शरदचंद्र पवारांनी अनेकदा पक्षाचा चेहरा फिरवला. अर्थातच जे पेरलं तेच उगवतं. त्यांना अंतर्गत चढउतार शोधता आले नाहीत. परिणामी अजितदादा पवार भला मोठा गट घेवुन बाहेर पडले. 90 टक्यापेक्षा विधीमंडळातील बहुमत त्यांच्या बाजुने आलं. सर्वाधिक खासदार, आमदार, पदाधिकारी अजितदादासोबत एवढे सर्वश्रुत असताना मागच्या काही दिवसापासुन फोडाफोडीच्या राजकारणाला भाजप जबाबदार असा टाहो स्वतः उद्धवजी ठाकरे, खा.सुप्रियाताई सुळे अलीकडे त्यांचे लेकरं आदित्य असतील, रोहित असेल छाती ब्ादडत फोडताना दिसतात. कधी तरी लेकरांनी आपल्या बापाचं काय चुकलं ?याचं आत्मचिंतन एक तर स्वतः करावा नाही तर बापालाच करायला लावावं. पण जणु काही हे सारं भाजपनचं फोडाफोडीचं राजकारण केलं अशा प्रकारचं खापर फोडत देशाच्या राजकारणात भाजपाला शिव्या घालण्याचं उद्योग असल्याचं लक्षात येतं. एक तर शरदचंद्र पवाराचं संपुर्ण आयुष्य फोडाफोडीच्या राजकारणातचं गेलेलं असुन राज्यात असा एकही जिल्हा नाही ज्या जिल्ह्यात पवारांनी प्रस्थापित असतील किंवा चांगले घराणे असतील त्यांच्यात भांडणे लावली नाहीत. अनेक उदाहरणे राज्याच्या राजकारणात कुटुंबातील देता येतील. एक गोष्ट खरी आहे की 2014 ला देशाच्या राजकारणात झालेले राजकिय परिवर्तन त्यातुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उदय पुन्हा 2019 ला बहुमताने मिळालेली संधी आणि मग भाजपाने घेतलेली उडी ही आता कुणी रोखु शकत नाही.लोकशाहीमध्ये पक्ष सत्तास्थानी कोणताही असो तो विस्तारवादाच्या भुमिकेतच काम करतो. भाजपा त्याला अपवाद नाही. मागच्या काही वर्षापासुन भाजपाने देखील विस्तारवादाला प्राधान्य देताना ज्यांना आमची भुमिका मान्य आहे, ज्यांना राष्ट्रहित आणि गरिबाचं कल्याण अर्थात सबका साथ-सबका विकास हे तत्व मान्य त्यांना आले तर आमच्यासोबत घेण्याचं काम सुरू केलेलं ज्या प्रवाहात केवळ राज्यात नव्हे तर देशाच्या राजकारणात अनेक मातब्बर नेते जोडले. अलीकडच्या काळात एकनाथ शिंदे असतील किंवा अजितदादा पवार असतील हे वर्तमान राजकिय व्यवस्थेत त्यांचं अजिंडा घेवुन सत्तास्थानात काम करताना दिसतात. दोन्हीही नेते मजबुत आणि सक्षम असुन कुठं तरी त्यांच्यापुर्वीच्या नेतृत्वानेच आत्मचिंतन करण्याची गरज वाटते.हे सारं पाहिल्यानंतर एक गोष्ट निश्चित सांगावी वाटते की लग्न झालं, दोन-चार वर्षे होवुन ग्ेली. एव्हाना बारा वर्षे झाली तरीही संतती प्राप्त होईना. मग अशा वेळी शेजाऱ्याचा दोष काय असु शकतो ? किंवा त्यांच्या नावाने ओरड कशामुळे करायची ? असाच प्रकार राज्याच्या वर्तमान राजकारणात सद्या सुरू असुन गट फुटाफुटीच्या राजकारणाचं खापर भाजपावर फोडणं म्हणजेच शेजाऱ्यावर दोष ठेवण्यासारखंच म्हणावे लागेल.

## यशाने हुरळून जाऊ नये



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**चीनमध्ये नुकत्याच पार पडलेल्या आशिया क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करत तब्बल १०७ पदकांची लयलूट केली. भारताची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे कारण भारताने पहिल्यांदाच पदकांची शंभरी ओलांडली आहे. या १०७ पदकात भारताने २८ सुवर्णपदक, ३८ रौप्य आणि ४१ ब्राँझ पदके आहेत. भारतीय खेळाडूंची ही कामगिरी अभिमानासपद आहे. भारतीय संघ यावेळी चांगली कामगिरी करेल आणि पदकांची शंभरी ओलांडेल अशी अपेक्षा होतीच कारण भारतीय संघातील सर्व खेळाडू पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरले होते. गेली जवळपास चार वर्ष भारतीय खेळाडू हे यश मिळविण्यासाठी रात्रीचा दिवस करत होते.**

भारतीय खेळाडू मैदानी स्पर्धेत म्हणावी तशी कामगिरी करत नाहीत अशी टीका नेहमी केली जाते आणि त्यात तथ्यही आहे मात्र मागील दशकभरात हे चित्र बदलत आहे. विशेषतः तिरंदाजी, नेमबाजी, कुस्ती, बॅडमिंटन, भालाफेक यासारख्या खेळात भारताने नेहमीच चांगली कामगिरी केली आहे मात्र प्रत्येक वेळेस भारतीय खेळाडूंना यश मिळतेच असे नाही यावेळी मात्र खेळाडूंनी यश खेचून आणले अर्थात याबाबत सरकारचेही अभिनंदन करायला हवे. मागील काही वर्षात भारत सरकारने खेळाडूंना सर्व सोयी सुविधा पुरवल्या आहेत त्यांच्यासाठी सर्वोत्तम प्रशिक्षकाची नेमणूक केली आहे त्यामुळे खेळाडू आपले कर्तृत्व सिद्ध करू शकले. सरकारने सुरु केलेले खेलो इंडिया या उपक्रमाचा देखील खूप लाभ झाला आहे. आज ज्या खेळाडूंनी पदके मिळवली आहेत ते खेळाडू २० ते २५ वयोगटातील आहेत. खेलो इंडिया उपक्रमातुनच यातील काही खेळाडू देशाला मिळाले आहेत. देशातील कानाकोऱ्यात विशेषतः ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये खूप गुणवत्ता आहे मात्र या खेळाडूंना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती. खेलो इंडियाने खेळाडूंना ती संधी मिळवून दिली आणि खेळाडूंनी त्या संधीचे सोने केले या बद्दल भारतीय खेळाडूंचे अभिनंदन करायलाच हवे मात्र या यशाने खेळाडूंनी हुरळून जाऊ नये हे देखील तितकेच खरे कारण आशिया क्रीडा स्पर्धा म्हणजे शेवट नाही ती तर सुरवात आहे. भारतीय खेळाडूंचे अंतिम ध्येय हे ऑलिम्पिक असायला हवे कारण ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंची कामगिरी नेहमीच निराशाजनक राहिली आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला एका हाताच्या बोटावर मोजता येतील इतकी पदके मिळतात. देशासाठी ही लाजिरवाणी बाब असली तरी ते सत्य आहे हे चित्र बदलायला हवे. ज्या देशाची लोकसंख्या काही लाखांच्या घरात आहे ते देश पदकांचे इमले रचतात आपण मात्र दोन चार पदकांवर समाधान मानतो. आता या खेळाडूंकडून देशाला मोठी आशा आहे. आशिया क्रीडा स्पर्धेतील पदक विजते खेळाडू ऑलिम्पिकसाठी पात्र ठरतात. या खेळाडूंनी आतापासूनच ऑलिम्पिकची तयारी करायला हवी. भारत सरकारनेही या खेळाडूंना सर्व सोयी सुविधा पुरवायला हव्यात. ऑलम्पिकमध्ये भारताला पदके मिळवून देतील अशा खेळाडूंना हेरून त्यांच्यासाठी जगातील सर्वोत्तम प्रशिक्षकाची सोय करायला हवी. साई अर्थात स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया आणि इंडियन ऑलिम्पिक असोसिशनने ही जबाबदारी स्वीकारायला हवी. साई आणि आय ओ सी ने ही जबाबदारी स्वीकारली आणि सरकारने त्यांना हव्या त्या सर्व सोयी सुविधा पुरवल्या तर ऑलिम्पिकमध्ये देखील भारताचा तिरंगा असाच अभिमानाने फडकेल यात शंका नाही.









हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महिलांनो रस्त्यावर उतरा, केसेस टाकल्या तरी हरकत नाही

## शरद पवार : सरकार बदलल्यावर केसेस हटवू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार महिला मेळावा आज मुंबईत पार पडला. यावेळी महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, खासदार सुप्रिया सुळे, अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन केले. शरद पवार यांनी महिलांना अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरण्याचं आवाहन केले. समाजात चुकीचं काही दिसलं तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरु नका. सरकार बदलत असतं, आपण त्या केसेस मागे घेतो", असं शरद पवार म्हणाले. अनेक तास बसून देखील कुणी सभागृहाच्या बाहेर गेलं नाही. सर्वांनी संघटनात्मक कामाबाबतची भूमिका मांडली आणि ऐकूण देखील घेतली आहे. आपल्याला काही कार्यक्रम हाती घाययचे आहेत यामध्ये महिला आरक्षण, महागाई असे मुद्दे आहेत. आपण महिला आरक्षणाचा निर्णय घेतला होता.आरक्षण निर्णयामुळे स्पष्ट झाले की महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत.

आपण संरक्षण खात्यात आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी अनेकांचा विरोध होता. मात्र मी स्वतः मंत्री म्हणून तो निर्णय घेतला आणि आता तुम्हाला महिला सैन्यात दिसत आहेत. ही जमेची एका बाजूला परिस्थितीत आहे, दुसरीकडे मणिपूरसारखी घटना समोर येते. त्यामुळं आपल्याला जागरुक राहावं लागणार आहे. जर आता असा प्रकार कुठं घडला तर आपल्या भगिनी रस्त्यावर



उतरायला हव्या. काय होईल तर ते केस टाकतील, विविध कलमे लावत असतात. तुम्ही चिंता करु नका, सरकार बदलत असते आणि आपण त्या केसेस काढून टाकत असतो.

आता शाळा समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले यांनी विरोध असताना शाळा काढली आणि आता शाळा बंद करणं योग्य नाही. असे होत असताना तुम्ही शांत बसत असाल तर हे योग्य नाही. सरकारी नोकरी कमतरता आहे. एका बाजूला नोकऱ्या नाहीत आणि दुसरीकडे रिक्त जागा मोठ्या आहेत. आणि सरकार कंत्राटी पदावर नेमणुका करत आहेत हे योग्य नाही.

कंत्राटी पद्धतीमुळे महिलांना संधी मिळणार नाही सरकारी नोकरीमुळे कुटुंबात स्वास्थ्य असते, परंतु कंत्राटी पदावर नेमलं तर तिथं आरक्षण नाही त्यामुळं मला खात्री आहे तिथं महिलांना संधी मिळणार नाही. त्यामुळे आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल.

पावसाळी अधिवेशनात अनिल देशमुख यांनी प्रश्न विचारला होता की 1 जानेवारी पासून 1 मे पर्यंत किती महिला बेपत्ता आहेत? याचं उत्तर मिळालं की 19 हजार 553 महिला बेपत्ता आहेत. याचं रेकॉर्ड देखील आहे. शाळा खाजगी कंपनीला देण्याचा यांनी निर्णय घेतला आहे. आता जी शाळा कंपनी दत्तक घेईल तिला तिचा वापर करता येईल. आता याचं उदाहरण द्यायचं झालं तर नाशिक जिल्हयातील एक शाळा मद्य कंपनीला दिली आणि त्यांनी त्या शाळेच्या ग्राऊंडमध्ये गौतमी पाटीलचा कार्यक्रम घेतला हे गंभीर आहे.




# कन्नड येथील आमदार उदयसिंग राजपुत यांच्या आमसभेत मराठा समाज आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शिवसेनेचे आमदार उदयसिंग राजपुत यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी कन्नड शहरातील गजानन हेरीटेज येथे आमसभेचे आयोजन केले होते .

ही आमसभा खुप वर्षा नंतर झाल्याने तालुक्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयातील पदअधिकारी कर्मचारी राजकीय पक्षातील नेते पद अधिकारी नांगरीकांची उपस्थीती होती तालुक्यातील रेंगाळलेले कामे नागरीकांनी सभेत सांगुन ते निकाली काढण्यासाठी या आमसभेचे आयोजन करण्यात आले होते .

यात महसुल विभाग, पंचायत समिती विभाग, वैदयकीय विभाग, महावितरण विभाग ,पाणी पुरवठा विभाग, कृषी विभाग व इतर विभागातील पद अधिकारी तसेच कर्मचारी यांची उपस्थीत होते . या वेळी तालुक्यातील रस्ते, पाणी ,शिक्षण , सिंचन विहीर , गायगोठे, लाईट इ त्यादी विषयावर चर्चा होत असतांनी मराठा युवकांनी घोषनाबाजी करत आमदाराचा राजीनामा मागीतला या आमसभेत मराठा समाज चांगलाच आक्रमक दिसुन आला असुन मात्र आमदाराने राजीनामा देऊन आरक्षण मिळणार नाही असे बोलुन मोकळे झाल्याने सभेत एकच गोंधळ उडाल्याचा दिसुन आला एक मराठा लाख मराठा या जय घोषाने सभ स्थळ दणानुन सोडले या वेळी आमदार उदयसिंग राजपुत उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विदयाचरण कडवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय ठाकूरवाड, पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, रजिस्टार युवराज बैसाणे मुख्यअधिकारी नंदकिशोर भोंबे, नायब तहसीलदार मोनाली सोनावणे, प्र. अ. एच एस कोलमवाड, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे यांची उपस्थीती होती.

# वीज केंद्रातील कुणाल कंपनीचा मनमानी कारभार, कामगारांचे वेतन पुन्हा थकविले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाऔष्णिक वीज केंद्रातील कुणाल या प्रायव्हेट कंपनीत काम करणाऱ्या कामगारांचे वेतन पुन्हा एकदा थकल्यानं कुणाल कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.तर कामगारांमध्ये रोष निर्माण झाला असून पुन्हा एकदा वीज केंद्र प्रशासन व कुणाल कंपनी विरोधात आंदोलन का करू नये? असा संतप्त सवाल उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी उपस्थित केला आहे. कामगारांचे वेतन नियमित देण्यात यावे, 10 तारखेच्या आत सर कामगारांचे वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यात



यावे, कामगारांचे पीएफ वेळेत भरण्यात यावे यासह विविध मागण्यांना घेऊन उलगुलान संघटनेने मागील महिन्यात मेजर गेट समोर आमरण उपोषण केले होते.त्यानंतर वीज केंद्र प्रशासन व कुणाल कंपनीच्या व्यवस्थापकांनी आंदोलन स्थळी भेट देत कामगारांच्या सर्व मागण्या मान्य केल्या.तसे लेखी पत्र सुद्धा दिले.मात्र आता 10 तारीख लोटून गेल्यानंतर सुद्धा कामगारांचे वेतन न मिळाल्याने रोष व्यक्त करण्यात येत आहे.वीज केंद्र प्रशासन व कुणाल कंपनी तुपाशी आणि कामगार मात्र उपाशी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळं पुन्हा एकदा कामगारांना सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा राजू झोडे, रवि पवार श्याम झिलपे मंगेश बदकल गुरु भगत सुमित भिमटे अक्षय काकडे सुरज जोगी पंकज इगोले प्रफुल्ल पाटिल यांनी दिला आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांचा बुडून मृत्यू

**नाशिक :** जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोनजणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. मालेगाव तालुक्यातील तळवाडे येथील विटावकर वस्ती परिसरात दुर्गेश सोनवणे (१६) हा शेती महामंडळाच्या शेतातील विहिरीत बुडालेल्या अवस्थेत सापडला. त्याला तातडीने मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत जयवंत सानवणे (३८) यांचा मृतदेह धरणगाव खडक येथील पालखेड डावा कालवा पाण्यात आढळला. या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वतःची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# आनंदामृत ज्ञानेश्वरी! जेथ परमानंदु केवळु। महासुखाचा ॥




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मागील आठवड्यात ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या जयंती निमित्ताने ज्ञानोबारायांच्या शब्दाने पल्लवित होऊन "आनंदामृत ज्ञानेश्वरी" या शीर्षकाचा एक लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आणि त्या दिवसांपासून श्री ज्ञानेश्वरीतील एकापेक्षा एक सरस असणाऱ्या शब्दामृतावर लिहिण्याचा प्रयत्न सुरु केला. आज त्यातील हा दुसरा लेखन प्रपंच! एखाद्या वस्तूचे वर्णन किती रसाळ आणि सार्थ असावे? याची अनेक उत्तमोत्तम उदाहरणे ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीत वाचायलाच काय अनुभवायला मिळतील!**

महाभारताच्या भीष्म पर्वाच्या प्रारंभी जेंव्हा कौरव-पांडवांचे युद्ध श्रीकृष्णाच्या शिष्टाईनेसुद्धा थांबत नाही तेंव्हा कौरव-पांडव हे सख्खे चुलत भाऊ एकमेकांसमोर संपत्तीसाठी युद्ध करायला उभे राहतात. दोन्ही बाजूकडून प्रचंड मोठे सैन्यदल उभे आहे. एकीकडून भीष्म-द्रोण-कर्ण-दुर्योधन तर दुसरीकडून श्रीकृष्णाच्या सारथ्य असणाऱ्या पांडवांच्या सैन्यात पाच पांडव आणि त्यांच्या समर्थकांचा मोठा सैनिक समुदाय युद्धासाठी सज्ज झाला आहे. श्रीमद् भगवद्गीता हा एक अद्‌भुत ग्रंथ असून आत्तापर्यंत अनेक महानुभावांनी गीतेवर भाष्य केले आहे. आचार्य शंकराचार्य, आचार्य श्री रामानुज, श्री मध्वाचार्य म्हणजेच आनंद्तीर्थ, श्री वल्लभाचार्य, आचार्य श्री निम्बार्क, श्री मधुसूदन सरस्वती आदि महान तत्ववेत्त्यांनी गीतेवर भाष्य करतांना गीतेचे ज्ञान आणि श्रेष्ठत्व प्रतिपादित केले आहे. या सर्वच महान तपस्वी महानुभावांनी गीता सांगताना तिचे अनेकानेक पैलू उलगडून दाखविले आहेत. यांच्या यादीत शेवटचा क्रमांक लागतो तो संत ज्ञानेश्वरांचा! ज्ञानदेवांनी प्राकृत भाषेत श्रीमद् भगवद्गीता मराठी माणसांना सांगण्याचा उत्तमोत्तम अविष्कार केला आहे असे म्हणणे वावगे ठरू नये! एखाद्या ग्रंथाचे भाषांतर केल्यानंतर किंवा त्याची समीक्षा केल्यानंतर एक नावितम ग्रंथच तयार होत असतो आणि तो ग्रंथ म्हणजे ज्ञानदेवांनी भाषांतरीत केलेली गीता म्हणजेच ज्ञानेश्वरी होय!

अनेक ग्रंथांनी मराठी भाषा समृद्ध आणि सर्वांगसुंदर झाली आहे; परंतु ज्ञानदेवांनी गीतेचा ज्ञानेश्वरी रुपात केलेला मराठी भाषेतील अनुवाद म्हणजे मराठी भाषेला सर्वांगसुंदर आणि समृद्ध करणारा हा सर्वोत्तम ग्रंथ झाला आहे! ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेचा एक उच्चतम दागिनाच आहे! भाषा सौंदर्य आणि भाषेचा गोडवा कसा असावा? भाषांतर कसे असावे? याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरी! भाषेला सजवायचे कसे? भाषेला लोकप्रवाही करून तिच्यातील सौंदर्य सामान्य माणसांच्या जीवनी कसे ठसवायचे, बसवायचे? याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री ज्ञानेश्वरी! ज्ञानेश्वरी ग्रंथ म्हणजे अगदी उसा सारखा गोड ग्रंथ! ऊसाला जसजसे आणखी सोलत सोलत खात जावे तसतसा ऊस आणखीनच गोड लागतो! आणखी खायचा मोह आवरत नाही, अगदी ज्ञानेश्वरी ग्रंथ तसा आहे! एकाचवेळी मराठी रसिकांना रसिकत्व आणि रसिकतत्व उलगडून दाखवणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी! श्रीमद् भगवद्गीतेवरील हिंदी समीक्षा ग्रंथात एक हिंदी समीक्षक ज्ञानेश्वरी विषयी लिहितांना, "ज्ञानेश्वरी टीका की सबसे बडी विशेषता याह है की ईसपर काही किसी विशेष सांप्रदाय की छाप नाही है. जो कूछ कहा गया है वो सब प्रकार के सांप्रदायिक भावो से दूर और गीता का यथार्थ समझने की दृष्टी से कहा गया है." असे लिहितात. ही प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे याचे कारण म्हणजे गीतेवरील ज्ञानेश्वरी हा टीका ग्रंथ सर्वच धर्म, सांप्रदाय, पंथ यांच्यासाठी उत्तम मार्गदर्शक ग्रंथ म्हणावा लागेल. त्यासाठी ज्ञानेश्वरीवर एका विशिष्ट सांप्रदायाचा शिक्का मारून त्या बहुमोल ग्रंथाला बंदिस्त करण्यासारखे होईल! हा ग्रंथ म्हणजे अनमोल खजाना आहे. ज्याला जे पाहिजे ते या ग्रंथात समाविष्ट आहे. याच अनुषंगाने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेला ललामभूत करणारा उत्तम ग्रंथ म्हणून सर्वच रसिकांच्या मनीमानसी खोलवर उतरला आहे आणि सातत्याने उतरत राहणार आहे. त्याचबरोबर मी माझ्या या लेखातून तमाम मराठी भाषेच्या रसिकांना विनंती करतो की; आपण एकदा तरी ज्ञानेश्वरी ग्रंथाचा रसास्वाद घेऊन तिचे शब्द माधुर्य चाखण्याचा नक्की प्रयत्न करावा जेणेकरून मराठी भाषेतील सर्वांत सुंदर-गोड ग्रंथ वाचनापासून मागे राहता कामा नये! श्रीमद् भगवद्गीता प्रारंभी श्रीकृष्णाचा प्रिय शिष्य श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्याच्या मधोमध उभा करायचा आदेश देतो. परंतु अगदी प्रारंभीच वाचकांना ज्ञानेश्वरी आपले वेगळेपण दाखवून जाते. कोणताही ग्रंथप्रवेश करतांना एखाद्या देवतेची आराधना केली जाते त्याचा न्यायाने माऊली आरंभी श्री गणेशाचे रसाळ, मधाळ आणि गोड स्तवन, वर्णन करतांना वाचकांना आणि श्रोत्यांना ग्रंथाची गोडी लावतात. गणपती




म्हणजेच एका समूहाचा प्रमुख. या न्यायाने त्या प्रमुखाचे वर्णन करतांना एकेका ओवीने आपली आणि ग्रंथाची सौंदर्य दृष्टी फुलत जाते. हे गणेशा, तूच संपूर्ण प्राणिमात्रांच्या बुद्धीचा प्रकाशदाता असून तुझ्या चिंतनाने आत्मरूपी ज्ञानवेद प्रकाशमान होतात. तू म्हणजेच शब्द जो वेद आणि देव म्हणून सुद्धा जाणला गेला! शिवाय सहा शास्त्रे, अठरा पुराने, उपनिषदे यांचे वर्णन करणारा शब्द म्हणजेच तू आहेस! घराघरात आणि चाचारांत केवळ आणि केवळ शब्दांचाच प्रकाश आहे! शब्द-श्री गणेश म्हणजेच या विश्वातील सुंदर काव्य! अप्रतिम नाटक! एवढेच काय बालकाच्या नाजूक पायातील छुमछुम मंजुळ ध्वनी सुद्धा तूच आहेस! देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका। त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥ एवढेच काय? अनेक दागिन्यांची कुशलता, सुगरणीच्या हाताने बनवलेल्या अनेक पदार्थांची माधुर्यता म्हणजे तूच! श्री गणेशा, तू म्हणजे पृथ्वीवरील एकापेक्षा एक सुंदर रत्नच! तू एवढा सुंदर आहेस की; व्यासाच्या कमरेचा शेला तूच आहेस! नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी। दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ॥ ८ ॥ ज्याप्रमाणे एखादी आई आपल्या लाडक्या गोंडस बाळाला सुंदर दागिने घालून नटवते अगदी तसेच संत ज्ञानदेवराय गणेशाला अनेक अतिसुंदर उपमांनी नटवतात, सजवतात! एकापेक्षा एक उपमा देतांना ज्ञानेशांची प्रतिभा खुलत जाते. प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ। सरिसेपणें एकवटत इभ-। मस्तकावरी ॥ १७ ॥ श्रुति-स्मृतित आलेली तत्वे म्हणजे गणपतीच्या अंगावरील तेजोमय पोवळी असूनव द्वैत-अद्वैत ही त्याच्या मस्तकावरील गंडस्थळे एकत्र आलेली आहे. एवढेच काय? गणपती म्हणजे वाणीची अपूर्व क्रीडा आहे! चातुर्य, वाग्यज्ञ आणि कला!

आतां अभिनव वाग्विलासिनी । ते चातुर्यार्थकलाकामिनी। ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ २१ ॥

विश्वमोहिनी कला गणपतीच्या रूपाने मी इथे वारंवार वंदन करतो! यामुळे माझ्या डोळ्यांत अंजन घातल्यासारखे झाले असून माझी दृष्टी तेजोमय झाली आहे! श्री गणेशाचे एवढे रसाळ, मवाळ, मधाळ आणि सर्वांगसुंदर वर्णन मराठी भाषेच्या एकाही ग्रंथात सापडत नाही. तो विवेकवंतु, सुविमळु, केवळ परमानंद श्री गणेश! उपमा आणि उपमेय यांचा अतिसुंदर मिलाप म्हणजे हा ग्रंथ प्रवेश! युवा असलेले ज्ञानदेव महत्तम प्रतिभेचे धनी झाले. त्यांची विचार आणि विवेकशक्ती प्रज्वलित झाली. एकेका संस्कृत शब्दाला हजारो मराठी सुमधुर प्राकृत शब्दांचे धुमारे फुटले! ज्ञानेश्वरी ग्रंथात ज्ञानदेवांची सर्वोच्च प्रतिभा फुलली असून एकेका विचाराला हजारो मधुर शब्दरूपी फळे लगडली असून आपण ती मोठ्या आदराने आणि चातुर्याने प्राशन करूयात! जय ज्ञानोबाराय!

# अभिनेता पुत्राचे घवघवीत यश पिता पाहू शकला नाही

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटांमधे चरित्र व्यक्तिरेखा अनेक कलावंतांनी केल्या; पण अभिनेते जयंत यांची गोष्टच वेगळी होती. आकर्षक व्यक्तिमत्त्व, बलदंड शरीरयष्टी, धीर गंभीर आवाज आणि पडद्यावर आपल्या उपस्थितीची जाणीव करून देणाऱ्या या अभिनेत्याचा जन्म आता पाकिस्तानात असलेल्या पेशावर शहरात १५ ऑक्टोबर, १९१५ या दिवशी झाला. आपल्या पित्याच्या चवथ्या आणि सगळ्यात लहान पत्नीचे पुत्र असणारे जयंत आपल्या तीन भावांमधे सर्वात धाकटे होते. वडिलांनी प्रेमाने त्यांचे नाव जकारिया खान असे ठेवले होते.**

जयंत यांचे पिता पूर्वीच्या काळातील राजस्थान संस्थानातील अलवरच्या महाराजांचे वैयक्तिक क्रीडा प्रशिक्षक होते. वडील क्रीडा प्रशिक्षक असल्यामुळे जयंत अनेक खेळांमधे तरबेज होते. जयंतना शिक्षणात फारसा रस नसल्याने ते चवथ्या इयत्तेपर्यंतच शिकले होते. मात्र चित्रपटक्षेत्रात आपली कारकीर्द सुरू करण्यापूर्वी ते अलवरमधे पोलिस अधिकारी म्हणून नोकरी करीत होते. त्यांच्या वडिलांची अशी इच्छा होती, की आपला मुलगा शिकला सवरलेला नसला तरी त्याने जीवनाचा अभ्यास मात्र केलाच पाहिजे. त्याने हिंडावे फिरावे, निरनिराळया लोकांना भेटावे आणि जीवन म्हणजे काय हे समजावून घ्यावे. त्यानंतर आयुष्यात काही तरी बनण्यासाठी जयंत आपल्या थोरल्या बंधूंसमवेत अलवरहून मुंबईला आले. मुंबईच्या दादर भागात काही फिल्म स्टुडिओ आहेत, असे कोणी तरी त्यांना सांगितले. जयंत एका स्टुडिओच्या प्रवेशद्वारावर पोहोचले पण त्यांना कोणी आत जाऊच दिले नाही. मग ते अंधेरी या मुंबईच्या उपनगरातील एका स्टुडिओकडे आले. त्या स्टुडिओचा पहारेकरी एक पठाण होता. जयंतही स्वतः एक पठाणच असल्याने त्यांनी पहारेकऱ्याला आपली इच्छा बोलून दाखविली. त्याने स्टुडिओचे मालक विजय भट्ट यांच्याशी जयंत यांची भेट घालून दिली. जयंत यांच्याशी बोलताना भट्ट यांच्या लक्षात आले, की हा तरुण अश्वारोहण, तलवारबाजीसह अन्य क्रीडाप्रकारांमधेही पारंगत आहे. त्यांनी जयंत यांना आपल्या `संसार लीला' या गुजराती चित्रपटात भूमिका करण्याची पहिली संधी दिली आणि त्यांच्या थोरल्या बंधूंना `प्रकाश पिक्चर्स'मधे



सहायक दिग्दर्शक म्हणून काम दिले. विजय भट्ट यांनी जकारिया खान हे नाव बदलून चित्रपटासाठी `जयंत' असे नामाभिधान केले आणि त्यांचा महिना ३० रुपये पगार ठरविला. त्याकाळी एकीकडे सामाजिक व धार्मिक चित्रपट निर्माण होत होते तर दुसरीकडे देमार चित्रपटही बनू लागले होते. त्यात प्रामुख्याने नादिया, जॉन कॉवस, जयंत आदी कलावंत होते. `बॉम्बे मेल', `हिज हायनेस', `स्नेहलता', `चॅलेंज', `बिजली', `स्टेट एक्सप्रेस' आदी चित्रपटांमधे जयंत प्रमुख अभिनेता म्हणून चमकले. निर्माते-दिग्दर्शक सोहराब मोदी आपल्या `मिनर्व्हा मुव्हिटोन' या चित्रपट निर्मितीसंस्थेतर्फे `सिकंदर' हा चित्रपट निर्माण करीत होते. त्यांनी जयंत यांना सिकंदरची प्रमुख भूमिका दिली. जयंतना धूम्रपानाचे व्यसन होते. एकदा ते सेटवरच धूम्रपान करीत होते आणि नेमके हे सोहराब मोदी यांच्या दृष्टीस पडले. त्यांना अर्थातच ते आवडले नाही. यावर जयंत त्यांना म्हणाले, की मी यापुढे सेटवर असताना धूम्रपान करणार नाही; बाहेर जाऊन करेन. पण मोदी ते ऐकायला तयार नव्हते. शेवटी जयंत यांनी `सिकंदर' चित्रपटच सोडून दिला. नंतर सिकंदरची व्यक्तिरेखा पृथ्वीराज कपूर यांनी साकारली. जयंत यांच्या कुटुंबीयांच्या इच्छेनुसार ते कुमारन सुलतान या तरुणीशी विवाहबद्ध झाले. त्यांची अर्धांगिनी एक गृहकृत्यदक्ष गृहिणी तर होतीच शिवाय चित्रपट व्यवसायापासून दूरच राहून आपले कुटुंब सांभाळण्यात धन्यता मानणारी होती. या जोडप्याला इम्तियाझ, इनायत आणि अमजद अशी तीन अपत्ये होती. त्यानंतर एक वेळ अशी आली, की जयंतना चित्रपट मिळेनासे झाले. मात्र जयंत स्वाभिमानी असल्याने ते कोणत्याही निर्मात्याकडे काम मागण्यासाठी गेले नाहीत. पण प्रतिकूल दिवसही कायम राहात नाहीत. जयंत यांचे स्नेही असलेले निर्माते प्राण नाथ अरोडा यांनी त्यांना आपल्या चित्रपटात भूमिका देण्याची तयारी दर्शवून करार करण्यासाठी आपल्या कार्यालयात बोलावले; पण स्वाभिमानी जयंत त्यांच्या कार्यालयात गेले नाहीत. अखेर अरोडा स्वतः जयंत यांच्या निवासस्थानी आले आणि त्यांना आपल्या चित्रपटासाठी करारबद्ध केले. त्यानंतर मात्र जयंत यांनी मागे वळून पाहिले नाही. १९५८ साली प्रदर्शित झालेल्या `मधुमती'मधील पवन राजा, १९६४ सालच्या `हकीकत'मधील भारतीय पायदळाचे कमांडिंग ऑफिसर, १९६५ मधील `हिमालय की गोद में'मधील लाखन सिंह, १९७० सालच्या `हीर रांझा'मधील चौधरी आणि १९७१ या वर्षी प्रदर्शित झालेल्या `मेरा गांव मेरा देश' या चित्रपटातील हवालदार मेजर जसवंत सिंह या त्यांच्या भूमिका अविस्मरणीय ठरल्या. पण त्यानंतर जयंत यांचे दुर्दैव आड आले. त्यांना कर्करोगाने ग्रासले आणि आपला अभिनेता पुत्र अमजद याचा `शोले' हा पहिला वहिला व बहुविक्रमी चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी दोन महिने म्हणजे २ जून, १९७५ या दिवशी त्यांचे मुंबईत वयाच्या ५९ व्या वर्षी निधन झाले. `शोले' ऑगस्टमधे प्रदर्शित झाला. `शोले'मुळे अमजद खान यांना मिळालेली अभूतपूर्व लोकप्रियता स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याचे भाग्य काही या पित्याला लाभले नाही.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# कंजूस सेठ

आधुनिक केसरी

एका गावात खूप कंजूस सेठजी राहात होते. एक दिवशी त्यांनी दुकानावर त्यांच्या मुलाला बसवलं आणि सांगितलं की विना पैसे कुणालाही काही देऊ नको, मी जाऊन आलो. तेवढ्यात अचानक एक संत आले तिथे आले, जे वेगवेगळ्या ठिकाणांहून एका वेळेची भोजन सामुग्री घेत असत. त्यांनी मुलाला म्हटलं की बेटा मला जरा मीठ दे. मुलाने संताला डब्बा उघडून एक चमचा मीठ दिलं. आता सेठजी धावत धावत संताजवळ पोहोचले. तेव्हापर्यंत संत जेवण बनवून भगवानला नैवेद्य लावून जेवायला बसले होते. सेठजी लांबूनच म्हणाले, महाराज थांबा तुम्ही जे मीठ आणलं होतं ते मीठ नाही तर विषारी पदार्थ होता. कृपा करुन तुम्ही हे भोजन करु नका. संत म्हणाले, आम्ही तर प्रसाद घेणारच, कारण मी देवाला नैवेद्य दाखवलं आहे. नैवेद्य दाखवून जेवण सोडू शकत नाही. जर नैवेद्य दाखवलं नसते, तर कदाचित जेवणंही सोडलं असते. असं म्हणून संताने प्रसाद समजून जेवण सुरु केलं. हे पाहून सेठजी हैराण झाले. ते रात्रभर तिथेच बसून राहिले. सेठजींना राहून राहून ही चिंता सतावत होती की जर संताला काही झालं तर त्याची मोठी बदनामी होईल. रात्री जर तब्येत खराब झाली, तर कमीतकमी ते संताला वैद्यांकडे घेऊन जाऊ शकतील, म्हणून ते तिथेच थांबले.

विचार करता करता त्यांना झोप लागली. दुसऱ्या सकाळी रोजप्रमाणे संत लवकर उठले आणि नदीमध्ये स्नान करण्यासाठी गेले. सेठजी म्हणाले, महाराज तुमची तब्येत बरी आहे ना? यावर संत म्हणाले, देवाची कृपा आहे. यानंतर ते पूजेसाठी मंदिराकडे निघाले. जसं संतांनी मंदिराचं द्वार उघडलं तेव्हा तिथे भगवानच्या श्री विग्रहाचे दोन भाग झाले होते आणि त्यांचं शरीर काळं पडलं होतं. हे पाहताच सेठजी सर्व समजून गेले. भक्ताच्या अतूट विश्वासाला पाहून भगवानाने जेवणातील विष नैवेद्य



म्हणून स्वतः ग्रहण केलं आणि भक्ताला प्रसाद ग्रहण करु दिला. यानंतर सेठजींनी तात्काळ मुलाला दुकान सोपवलं आणि स्वतः संताच्या शरणात आले आणि देवाची भक्ती करु लागले.

# भावमुद्रा...



सुलेखा जक्कल
संपर्क क्र. ९२७००६४७२९

आधुनिक केसरी

**मध्यंतरी चिरंजीवासोबत लंडनच्या लायब्ररीत गेले. कित्येक नामवंतांची पुस्तके हारीने मांडून ठेवलेली होती. प्रचंड नि:स्तब्ध शांत वातावरण. सहजच मराठी विभागाकडे लक्ष गेले. एका शेल्फमधून दुर्गाबाई भागवतांचे"भावमुद्रा"हे पुस्तक मला डोकावताना दिसलं आणि 'फील अ‍ॅट होम'ची भावना मनाला आनंद देऊन गेली. कित्येक वर्षापूर्वी भावमुद्रा वाचताना मी भारावून गेले होते. परंतु इतक्या वर्षापूर्वी वाचलेले, सगळंच कसं धूसर होऊन गेलं होतं. पुनर्वाचनासाठी म्हणून मी ते पुस्तक उचललं.जाते. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले.**

पुस्तकातील लेख एकामागून एक उलगडत जात होते.पुन्हा वाचताना सगळंच नव्याने गवसत गेले. दुर्गाबाईंच्या उत्तुंग प्रतिभेची,अभ्यासपूर्ण व्यासंगी वृत्तीची, निर्भीड, परखड, करारी व्यक्तिमत्वाच्या आड असलेल्या त्यांच्या भावकोमल मनाची साक्ष देणारे हे ललित त्यांच्या स्वभावातील मृदुता, इतरांच्या सुखदुःखांनी व्यथित झालेले त्यांचे मन.. आपल्या परीने त्यांनी दुःखी लोकांना दिलेला..स्नेह पानोपानी दरवळत असलेला सुगंध वाचकाच्या मनांत ही दरवळतो...

दुर्गाबाईंचीअमूर्त तत्त्वचिंतनात्मक वृत्ती,अनुभवातील व्यामिश्रता.. ओघवती शैली या साऱ्या विशेषांमुळे त्यांचे लेखन अजोड वाटते. लेखात सुसूत्रता, अनुभवप्रामाण्यता.. प्रतिमा-प्रतीके यांची व पौर्वात्य-पाश्चिमात्य साहित्यकृतींतील संदर्भांची योजना आणि संवेदनांचे मिश्रण यामुळे या काही वेळा आकलनसुलभ तर काही कथेतील व्यक्तिचित्रे दुर्बोधही वाटतात.कदाचित एक वाचक म्हणून माझीच समज कमी पडत असावी. दुर्गाबाईंच्याजवळ असे काहीसे होतेकी अनोळखी व्यक्ती देखील त्यांच्या व्यथा त्यांना भेटून सांगत.. रित्या होत असत. अनेक लेखांमधून अशा व्यक्ती आणि त्यांचं भावविश्व त्यांनी साकारले आहे.त्यांच्या अबोल, मूक वेदनांना त्यांनी वाचा फोडलेली आहे. त्या त्या व्यक्तिमत्वाचा तळ शोधताना त्या व्यक्तींच्या विविध भावमुद्रा जसे न्याहाळतात तसेच दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहरी.. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये निसर्गाच्या डोंगर दऱ्या.. पर्वतांची शिखरे.. अनेक प्रतिमा.. आपल्या संजीवक लेखणीतून. सजीव करतात. त्या स्वतः एकरूप होऊन आपल्या भोवतालच्या व्यक्तींचा अंतर्वेध घेतात.. त्यांच्या सुख दुःखाच्या हिंदोळ्यावर झुलतात.. त्यांचे संवेदनक्षम मन.. त्या व्यक्तिरेखांच्या सोबत स्पंद पावते.. आणि वाचकाला ही त्या व्यक्तिरेखेशी एकरुप व्हायला भाग पाडतात हे त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे.

फिकट पिवळे पीस या लेखात.. दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहराच्या भावछटा.. त्या प्रहरांचा मनावर पडणारा प्रभाव.. इतक्या प्रभावीपणे.. अशा तरलतेने रेखाटला आहे.. वाचकही त्या भावमुद्रेमध्ये हरवून जातो. "बाहुली" मधे अतिशय लोभस.. देखण्या रुपाची फॅशनेबल अशी एक युवती.. सारे घडीव..बांधीव.. पण चेहऱ्यावर सतत निर्लेप भाव असलेली.. जिच्याविषयी लेखिकेला नेहमीचकुतुहल वाटायचे. जीवनातील कोणत्याही रंगांपासूनन अस्पर्शित, कोरडी, थोडी आत्मकेंद्रित अशी.. तिच्या अंतरंगाचा ठाव घ्यावा असे वाटत असताना तीच त्यांना भेटायला येते. तिच्या जीवनात अनेक विचित्र घटना घडलेल्या असतात. त्या दुर्गाबाईंना कळतात. ती अधून मधून त्यांची भेट घेत असते. पहिल्या नवऱ्याबरोबर घेतलेला घटस्फोट,मैत्रिणीच्या नियोजित नवऱ्याबरोबर दुसरे लग्न. सगळे अनुभव विलक्षण कोरडेपणाने अनुभवणारी ती जराही आतून न हलणारी.. जणू निर्जीव बाहुलीच. जेव्हा दुर्गाबाईंनी दिलेली पुस्तकं वाचते.. आणि त्या पुस्तकांना आपला सहचर बनवते.. तिचे न हलणारे काळीज पिळवटून जाते. ती मुक्त होत नाही परंतु मोकळं होऊन तिने आत्महत्या केल्याची बातमी कळते.. तेव्हा दुर्गाबाई त्यांच्या कथेत आपल्या बाहुलीचा सकारात्मक शेवट कल्पितात.. ज्यात त्या बाहुलीला अनुपम हर्ष.. जीवनाची जाणीव आणि अबोध भावनांची एकरूपता.. असोशीने जगताना मनःचक्षुंनी पाहतात. लेखिकेचे प्रचंड आशावादी मन आणि सकारात्मकतेची आस.. सौंदर्यासक्त .. निसर्ग वेडे.. रसिक मन.. डोंगर दऱ्यायावरून येणाऱ्या वाऱ्याच्या छोट्याशा झोताबरोबर पण आपली आंतरीक लय साधते. तर कधी विस्तीर्ण पर्वत रांगांरोबर संवाद साधते.. नद्यांबरोबर.. चपलतेने वाहते. तर कधी महासागराच्या.. खोल डोहाचा वेध घेते.. कधी अनोळखी मानवी जीवनात चाललेली खळबळ असो वा संघर्ष..त्यातून व्यथित होते.. शक्य असल्यास त्यांच्या जीवनातली पोकळी दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते.. त्यांची मनोव्यथा ऐकून घेत.. धीराचे समुपदेशन करत.. मदतीचा हात पुढे करतात.

टोक.. टोक.. टोक ' या छोट्या पहिल्या लेखात.. तांबट पक्षाच्या त्या टोक टोक आवाजावरून.. त्यांनी कोणते टोक गाठले आहे.. त्याला तुलना नाही..ग्रंथालयातील कपाटातून.. M.T जॅक्सन ची पुस्तकं जेथे होती.. त्या पुस्तकांमधून दुर्गाबाईंना.. जॅक्सन आपल्या व्यक्तीत्वामधले काही तरी अव्यक्त,कोंडून राहिलेले, व्यक्त करण्याची धडपड करतो आहे.. दबलेला निःश्वास टोक टोक अशी साद घालतो आहे..

जॅक्सन बागेत ज्याचा खून करण्यात आला त्या इंग्रजद्वेषाने भरलेल्या मनास त्याची पुस्तकं वाचून लेखिकेचे भारावून जाणे.. ती वाचताना त्या व्यक्तिविषयीचे बदलते विचार.. लेखक म्हणून असलेली जॅक्सनची अभिरूची.. त्याने जमवलेली ग्रंथसंपदा.. हिरव्या गुलाबाची.. गुलाबांच्या अंगगंध नसलेली.. आणि सौंदर्यहीन फुलं.. त्याच्या अस्तित्वाबरोबर निगडित झालेली.. त्याच्या आवडीची फुलं.. या दोघांत ही साधर्म्य आहे असल्याचे दुर्गाबाईना जाणवते.. भारतीय परंपरेची आणि संस्कृतीची माहिती गोळा करताना.. नक्कीच भारता बद्धलचे सौहार्द जागे झाले असेल.. तो नक्कीच बदलला असेल असा विश्वास वाटतो.. त्याच्या पत्नीने आर्थिक मदतीसाठी रॉयल एशियाटिक सोसायटीला हा संग्रह विकत घ्यायलात लावला.. आणि ती भारतीयांच्या समृद्ध माहितीची विपुल ग्रंथ संपदा पाहून.. वाचून..लेखिकेला या ग्रंथांच्या पानोपानी जॅक्सन जाणवला आहे.. त्याची थोरवी पटलेली आहे.. तो खूप वेगळा वाटतो.. ऐकीव माहितीपेक्षाही. ते अर्धसत्य सांगण्यासाठी.. तो त्या पक्षाच्या आवाजात साद घालतो आहे.. अशी सुरेख कल्पना लेखिकेने केली आहे.. वास्तव आणि कल्पित यांच्याशी वाचकालाही सहमत करण्याची सिद्धी त्यांच्या लेखणीला लाभलेली आहे. फिकट पिवळे पीस मधे सुगंधाचे खजिने खुले करणाऱ्या फुलांचे..फुलपाखरांच्या विभ्रमांचे.. अंडी उबविण्यासाठी निवारा शोधणाऱ्या पाकोळीचे .. सूक्ष्म अवलोकनात्मक वर्णन केले आहे.सावल्या या लेखात सावल्यांचे आणि मानवी मोह, भय, निद्रा, क्षणिक मूर्छा.. हे संभ्रम सावल्यांचे.. तरी त्यांची अखेर सीमीत मर्यादा असते.सत्यासत्यापलीकडच्या..अनामिक..अरूप असलेल्या आत्मबोधाच्या बिंदूवर जीवन प्रवास संपावा.. अशी लेखिकेची तीव्र ओढ जाणवते.

मत्स्यमहाल मधे अपुर्या दिवसांचे कोणतेही नाव.. बंधन.. नसलेल्या छोट्या बालकाचा अंत पाहून खंतावलेले .. अशा अर्भकाचा जलराशीत विलीन होणारा देहाचा गोळा पाहून दुःखी झालेले हळवे मन प्रत्ययास येते.. चिरदाह मधे विविध वृक्षांचे.. ज्ञानशालेच्या द्वारापाशी.. ग्रंथालयाचे आणि त्यांचे असलेले जिवाभावाचे नाते.. तिथल्या व्यक्ती.. घड्याळ..भूतकाळातल्या स्मृती.. ज्ञान लालसेने तेथे नोकरी करणारा.. गावात शाळा सुरु व्हावी म्हणून धडपडणारा महमुद ..संघर्ष करुन थकलेली झाडूवाली सखुबाई.. तिच्यावर झालेला अपरिमित अन्याय.. तिच्या पुढच्या पिढीस ही ते दारूण दुःख भोगावे लागले.. त्यातच झालेला करुण अंत.. याचे चटका लावणारे कथन मन सुन्न करते. व्रती मधे.. कोणतेही काम न करता.. कधी टिळक.. कधी गांधीजी.. तर शेवटी सर्वोदयी विनोबांच्या पाठी लागलेल्या.. मावशीचां उद्धार करणारा..कधीतरी तीच्या जवळचे आपल्याला देईल अशी मदार ठेवून असलेला राष्ट्र प्रेमाचे ढोंग करणाऱ्या.. ज्या विषयी खूप संताप येई असा दामू रेखाटला आहे.. हतबल आणि नैराश्यपूर्ण लोकांविषयी ची त्यांची चीड.. घृणा लपत नाही. काही लेखांत त्यांचे सडेतोड.. स्पष्ट विचारही दिसून येतात.अमृतफुल मधे एका तान्ह्या बाळाला थोपटून निजवताना त्याचे केलेले निरीक्षण आणि झोपेतून अचानक उठलेल्या बालकाच्या नजरेतील भाव बघून दुर्गाबाई म्हणतात.. तुम्हाला कणाकणातून आरपार भेदून जाणारी आणि तुमचे तकलादू व्यक्तिमत्व संपूर्ण ओळखून बाजूला वळणारी ती नजर होती. जन्मोजन्मातून टिपत गेलेले, मुक्या, निरागस मानवतेच्या मुळाशी असलेले गाढ आणि गूढ शहाणपण जणू त्या डोळ्यांतून पाझरत होते..नीलिम्याची स्वयंभू ज्योतच त्यांना त्या इवल्याशा बालकाच्या नजरेतील दिप्तीत दिसते.. त्याच्या नजरेतील अविश्वासाची झलक तो गाढ झोपल्यावर बदलते .. आता मात्र द्वैतातले सारे माधुर्य..समंजसपणा.. तृप्ती त्याच्या चेहऱ्यावर.. बंद पापण्याआडची मुक्यातील मुग्ध चित्राकृती दिसते. अशा भावमुद्रा टिपताना त्यांनी केलेली खोल भाष्य त्यांचे जीवन रहस्य जाणल्याची ग्वाही देतात.. अद्वैताचा मागोवा घेण्याचा ध्यास त्यांच्या श्वासात जाणवतो.. पानोपानी जाणवतो..

महानदीचे गूढगुंजन मधे त्यांनी नद्यांकाठी केलेला स्वैर प्रवास. त्या त्या नदीविषयी असलेल्या रामायण.. महाभारतातील दंतकथा.. तेथे वसतअसलेल्या संस्कृती.. त्यांच्या जीवनपद्धती.. चालीरीती. काही अंधश्रद्धा.. त्याची लोकगीते.. यांचे रंजक चित्रदर्शी चित्रण आढळते.

ऊनपाऊस या छोट्या लेखात एका पक्षाच्या चिमणीच्या नर मादीचा अनुनय, प्रणय नंतर तृप्त झाल्यावर त्या पाखराचे दुसऱ्या चिमणी कडे सहज जाणे.. त्या नर पाखरांमधला फरक ह्यातून अनादी कळापासून मानवी स्त्री पुरुष यांच्यातील पुरुषी वर्चस्व.. आणि स्त्रीचे समर्पण.. तिची अगतिकता.. निसर्गाविष्काराने बहाल केलेली आत्मसमर्पणाची ऊर्मी पक्ष्यांमध्ये देखील दिसून येते. एकदा तिला आरशात दिसलेल्या आत्मस्वरूप प्रियमुर्तीचे वेड लागले होते.. यातून सत्य आणि भ्रम यातील अंधुकशी सीमारेषा अधोरेखित केली आहे. स्त्रियांची दुर्बलता,पुरुषांच्या वर्चस्वाला शरण जाणारी.. तर कधी संघर्षप्रवण स्त्री.. तीच्या आयुष्यातील विविध प्रसंगातील मनोभाव..निसर्गाच्या विविध छटा.. मानवी मनाच्या.. दिवस दुपार संध्याकाळ.. विविध प्रहरांच्या .. खास अशा भावरंगांचा.. विवध स्वभावाच्या व्यक्तींच्या असंज्ञ मनाच्या.. अज्ञात मितींचा.. गहन आणि उत्कट संवाद साधतात.. खोल मूळाशी जातात.. पहाड.. डोंगर वारा.. फुलं.. निसर्ग सानिध्यात.. शाश्वत निरवतेच्या गाभाऱ्यात वाचकाला ही घेऊन जातात.. अंतर्यामी च्या चिंतनाचा ..उच्चतम ज्ञानाचा स्पर्श जाणवतो.. तांदुळमणी मधे सागर किनाऱ्यावर.. वाळूत रुतलेल्या प्रत्येक पावलाबरोबर एकेका व्यक्तीचे जीवन दुर्गाबाईंच्या नजरेसमोर येते.. त्या तांदुळमणी वेचताना अगदी लहान मुलीसारखं वागतात.. या वयातही ते वेचण्याची शैशवातली ओढ पाहून अप्रुप वाटते.. तेथे जवळपास रहाणाऱ्या .. रोज तांदुळ मणी वेचणाऱ्या अनाथ मुलांविषयी त्यांना कणव आहेमहाराष्ट्राची दगडी शीर या लेखात दुर्गाबाईंनी महाराष्ट्राच्या इतिहासाचा साक्षी असलेल्या काळया कभिन्न सह्याद्रीचे उत्तुंग कडे.. तिथल्या दऱ्या.. झिजलेलले कातळ.. पिकणारी फळे.. वाहणाऱ्या नद्या..मराठी माणसांची आणि सह्याद्रीची समसमान गुण वैशिष्ट्ये.. अमोल संघर्ष.. मोकळ्या हवेची ओढ असणारा.. पणमनाने रांगडा असलेला.. तडजोड करण्यात मागे पडणारा मराठी माणूस आठवतो..अंतर्बाह्य कोमलता जेथे दुर्मिळच.. अशी सह्याद्रीच्या अंगभूत गुणदोषांची.. आणि मराठी माणसाची तुलना दुर्गाबाईंच्या लेखणीतून किती सहजतेने प्रवाही होत जाते.निसर्गातील विविध प्रतिमा.. समाजातील वेगवेगळ्या स्तरातील.. विभिन्न स्वभावाच्या व्यक्ती..त्यांचे वादळी जीवन .. स्त्रीची सोशीकता.. अन्यायाविरुद्ध ची आक्रमकता.. विविध अनुभवातून जाताना लागणारा कस.. लेखिकेने नजरेने पाहिले .. मनाने संवाद साधला.. त्यांचे अंतरंग.. विविध भाव भावमुद्रांमधे समर्थपणे शब्दांकित केलेले आहेत. त्यांनी केलेल्या ज्ञानार्जनाचा खजिना बऱ्याच लेखातून लखलखीतपणे दिसतो.. तेजस्वी बुध्दीमत्ता.. गूढ जीवनभाष्य ह्यातुन त्यांच्या चिंतनाची खोली ही जाणवते. दुर्गाबाई भागवतांनी लिहिलेल्या साहित्यातून त्यांनी साहित्याची केलेली साधना पाहून अचंबित व्हायला होते. या विदुषीची ग्रंथ संपदा खरेच अमोल आहे.. व्यासंगाच्या गाढ प्रीतीची..ती स्मृतिचिन्हे आहेत.. ती लक्षपूर्वक वाचायला हवीत! कुठेही भावनाविवश झाल्या तरी त्या त्यातून सहज तटस्थ ही होताना दिसतात.चिंतन, मनन,सखोल अभ्यास, सूक्ष्म निरीक्षण आणि एकरसता ही वैशिष्टये आधारभूत असल्याने वास्तवदर्शी परिमाण या भावमुद्रांना लाभले आहे. शब्द,भाषा,प्रतिभा ह्यावरील प्रभुत्वाबद्दल बोलायचे म्हटल्यावर काजव्याने सूर्याविषयी बोलावे असेच होईल..

# राखीची आयडिया..



उमेश मोहिते
माजलगाव
संपर्क क्र. ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**सकाळी दहाला टयूशन सुटली अन् राखी नि मीना घराकडं निघाल्या.दोघींची मग रोजच्यासारखी रस्त्याने बडबड सुरु झाली.पण त्यांचा आजचा विषय मात्र होता- आज शाळेत साजरा केला जाणा-या राखीपौर्णिमेचा ! .. राखी तिच्या सातवी ' क ' वर्गाची वर्गप्रमुख असल्यामुळं वर्गशिक्षिका मॅडमनी आजच्या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी तिच्यावरच सोपवली होती अन् तेच बोलत दोघी थोडंसं पुढं आल्या अन् अचानकच ब्रेक लागल्यासारख्या गप्प झाल्या.कारण त्यांच्या मागून तीन-चार मुलं उधळतच आली होती अन् त्यांनी त्यातल्या एकाला मारायलाही सुरुवात केली होती.गोंधळून गेलेल्या राखीनं पटकन् त्या साऱ्यांना ओळखलं.बाळू,राजू नि मन्या असे हे तिघेजण त्यांच्या वर्गातलेच होते अन् मार खाणारा गज्याही त्यांच्या वर्गातलाच होता.त्या दोघींही भेदरून त्यांच्या भांडणाकडे पाहू लागल्या..मार खाणाऱ्या गज्यानं आता रडायला सुरुवात केली होती अन् बाकीच्या मुलांचा आरडा-ओरडा सुरु होता.नेमका हा गोंधळ रस्त्यावरच सुरू होता.**

एवढयात मोटरसायकलवर जाणा-या दोन मोठया मुलांनी हे भांडण पाहिलं अन् त्यांनी गाडी थांबवली.ते दोघे पटकन गाडीवरून उतरले अन् त्यांनी भांडण सोडवलं.मग मारणारी सारी मुलं पळून गेली. पण गज्या मात्र रडतच घराकडे निघाला ...राखीला एकदम मोकळं झाल्यासारखं वाटलं.एवढयात मीनानं तिला अचानकच विचारलं , " मुलांना भीती कशी वाटत नसेल गं भांडणाची ? " " तश्शीच असतात मुलं.." राखी संतापाने बोलली अन् गप्प झाली.पण तिच्या मनात मात्र खळबळ सुरु होती.पाच-दहा मिनिटांतच त्या दोघी घरी आल्या ..

. राखी कशीबशी जेवली अन् मुलांच्या त्या भांडणाचाच विचार करत बसली.अचानक एक आयडिया तिला सूचली अन् ती स्वतःवरच खूप खूष झाली.त्या खुशीतच ती दोन राख्या घेऊन मीनाकडं आली.मग दोघी घाई घाईतच शाळेत आल्या अन् मॅडमना भेटल्या.राखीनं मॅडमना वर्गातल्या मुलांच्या भांडणाविषयी सांगून आपल्या मनातील आयडियाही बोलून दाखवली. मॅडमनाही तिची आयडिया आवडताच त्या दोघी खुषीतच वर्गात आल्या.लगेच प्रार्थनेची पहिली घंटा झाली अन् मॅडम हजेरी घेऊन वर्गात आल्या.त्यांना



बघताच सारी मुलं-मुली उभे राहिले अन् दुसरी घंटा होताच सर्वांनी एका तालात राष्ट्रगीत गायिलं. मग मॅडमनी उपस्थिती घेतली अन् राखीकडे बघत म्हणाल्या " राखी,करा आता सुरूवात.."

.. आदेश मिळताच राखी उठून उभी राहिली अन् बोलू लागली , " बंधूंनो नि भगिनींनो,आपल्या भारतीय संस्कृतीतील आजचा राखी पौर्णिमेचा सण हा एक महत्त्वाचा सण आहे.यादिवशी बहीण भावाला राखी बांधते अन् भाऊ तिला ओवाळणी टाकून तिच्या रक्षणाची जबाबदारी घेतो.म्हणून आज आम्ही साऱ्या मुलीही आमच्या वर्गातील सर्व वर्गबंधुंना राखी बांधणार आहोत नि त्यासाठी प्रत्येक मुलीनं घरून येतावेळी सोबत राखी आणली आहे.परंतू मी मात्र आज दोन राख्या आणल्या आहेत कारण मी आज दोघांना राखी बांधणार आहे नी हे दोघं कोणयंत हे ठाऊकंय का तुम्हाला ? .. तर ज्यांनी आज सकाळी ट्युशन सूटल्यावर मारामा-या केल्यात ते हे दोघंयत ! तसं तर या दोघांचं परवासुद्धा वर्गात भांडण झालं होतं.आता तुमच्या लक्षात आलं असेलच हे दोघं कोणयंत ते ! बाळू नि गज्या दोघांनी आता समोर यायचंय नि मी ओवाळल्यावर दोघांनीही मला ओवाळणी टाकायचीय...पण काय पाहिजेय मला ओवाळणी ठाऊकय का ? मला तुम्हा दोघांकडूनही वचन पाहिजेय,पुन्हा कध्धीच भांडण करणार नाहीत म्हणून ! या रे दोघंही पुढं लगेच ..." बाळू अन् गज्या दोघांनाही धक्काच बसला अन् ते बावरून मॅडमकडे बघू लागले.मॅडमनी इशारा करताच ते समोर आले अन् मान खाली घालून उभे राहिले.

मग राखी उत्साहातच पुढे झाली अन् तिनं दोघांनाही राख्या बांधल्या.मग हसतच तिने त्यांना विचारलं , " आता तुम्ही दोघंही माझे भाऊ झालात अन् मी तुमची बहीण.

आता मला सांगा,अजून भांडणार का तुम्ही दोघं आपसात ? बोला पटकन .. " बाळू अन् गज्या मात्र काही न बोलता गुपचूप खाली बघत राहिले. पुन्हा राखीनेच विचारले , " ओवाळणी देणारयत ना मला दोघंही ? " तिनं असं विचारताच दोघांनीही होकारार्थी मान हलवली. त्यांच्या उत्तराने आनंदित होऊन राखी पुन्हा म्हणाली, " आता तुम्ही आपसात भांडायचं नाही.द्या मला प्रॉमीस... हीच तुम्ही मला दिलेली ओवाळणी .... म्हणा दोघंही -.आता आम्ही कध्धीच आपसात भांडणार नाहीत ... " " यापुढं आम्ही दोघं कधीच आपसात भांडणार नाहीत.." बाळू अन् गज्या दोघंही काहिसे लाजतच म्हणाले अन् वर्गातल्या सर्वांनी खुशीतच टाळया वाजवल्या. मॅडमनी मग साऱ्यांना शांत राहायची सूचना करताच जादू केल्यासारखा पूर्ण वर्ग शांत झाला. मग मॅडम मुलांकडे बघत धीरगंभीरतेने म्हणाल्या, " मुलांनो,राखीला मुलांची भांडणं पाहवली नाहीत अन् तिनं ही आयडियाची कल्पना काढली अन् एका झटक्यात भांडणं मिटवली..

खरं सांगू मुलांनो, खरं सांगते,एका क्षणार्धात त्या दोघांच्या मनातली वैरत्वाची भावना लोप पावली .. ही आहे बरं आपल्या थोर भारतीय संस्कृतीची किमया ... या आयडियाच्या कल्पनेसाठी राखीचं अन् सोबतच बाळू नि गज्याचंही मी अभिनंदन करते .. . " मॅडमचे हे बोलणे ऐकून पुढच्याच क्षणाला सातवी ' क ' च्या वर्गात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

# लखबीर सिंग लख्खा 19 ऑक्टोबरला चंद्रपुरात

## 19 ऑक्टोबरपासून सुरु होणार पाच दिवसीय माता महाकाली महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** 19 ऑक्टोबरपासून चंद्रपूरात सुरु होत असलेल्या पाच दिवसीय श्री माता महाकाली महोत्सवाची जय्यत तयारी सुरु करण्यात आली असून महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी जगप्रसिद्ध देवी गीत जागरणकार लखबीर सिंग लख्खा चंद्रपूरात येणार आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री महाकाली माता समीतीच्या वतीने मागच्या वर्षी प्रमाणे यंदाही श्री महाकाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा सदर महोत्सव पाच दिवस चालणार असून या दरम्यान महाकाली मंदिर जवळच्या पटांगणात विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान 20 ऑक्टोबरला सारेगामा फेम निरंजन बोबडे यांच्या कार्यक्रमाचीही आयोजन करण्यात आले आहे. तर महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी आपल्या देवी गीत गायनाने जगात प्रसिध्द असलेले लखबीर सिंग लख्खा यांच्या देवी जागरण गायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे या महोत्सवाचे आकर्षण असणार असून सायंकाळी 7 वाजता या कार्यक्रमाला सुरवात होणार आहे. या कार्यक्रमाला महाकाली भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहण श्री महाकाली माता सेवा समीतीच्या वतीने करण्यात आले आहे.

19 ऑक्टोबरपासून आयोजित श्री माता महाकाली महोत्सवासाठी महाकाली मंदिर जवळील पटांगणात महोत्सवा करिता येणा-या माताच्या भक्तांसाठी भव्य मंडप उभारण्यात येणार आहे. आज मंगळवारला महाकाली माता महोत्सवाच्या पदाधिका-यांनी विधीवत मंडप पुजन केले. त्यांनतर येथील मंडप उभारणीला सुरवात झाली आहे. या प्रसंगी श्री महाकाली माता सेवा समीतीचे उपाध्यक्ष अजय जयस्वाल, सदस्य बलराम डोडाणी, मोहित मोदी यांच्यासह इतर पदाधिका-यांची उपस्थिती होती.

# सिन्नर तालुक्यात दोन बिबटे जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सिन्नर तालुक्यातील नायगाव परिसरात वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यांमध्ये दोन दिवसात दोन बिबटे अडकले. यात एक नर आणि एका मादीचा समावेश आहे. काही दिवसांपासून नायगाव, जोगलटेंभी, सोनगिरी परिसरात दुचाकीवरून जाणाऱ्यांवर बिबट्याने हल्ले केले होते. या पार्श्वभूमीवर, बिबट्याला पकडण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होऊ लागली होती. पश्चिम वन विभागाचे पंकज गर्ग, वनसंरक्षक अनिल पवार यांनी परिसरात जाऊन शेतकऱ्यांना सूचना केल्या होत्या. सिन्नर वनपरिक्षेत्र अधिकारी मनीषा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बिबट्याचा मागोवा घेत परिसरातील गावांमध्ये सातत्याने जनजागृती करण्यात येत होती. वन विभागाकडून लावण्यात आलेल्या जाळ्यात एक दीड वर्षाचा नर तसेच दुसऱ्या दिवशी दीड वर्षाची मादी बिबट्या अडकली. या कारवाईत नायगाव ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.



# २५टक्के अग्रीम पीक विम्यासाठी उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव काळे :** जळगाव (जा) तालुक्यातील पिंपळगाव काळे महसूल मंडळात तब्बल ३५ दिवस पावसाचा एक थेंब सुद्धा पडला नाही परंतु काही दिवसांपूर्वी पिंपळगाव काळे मंडळ २१ दिवस पावसात खंड पडल्यामुळे २५% अग्रीम पिक विमा मदतीतुन वगळण्यात आला आहे. पिंपळगांव काळे महसूल मंडळातील कृषी विभागामार्फत लावण्यात आलेल्या पर्जन्यमापक यंत्र महसूल मंडळाच्या शेवटच्या मोहीदेपुर गावात लावण्यात आले परंतु मोहीदेपुर वगळता मंडळातील कुठल्याही गावात पाऊस झाला नाही तरीही मंडळातील बाकीच्या गावावर अन्याय का? म्हणून आज शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शेतकऱ्यांना तात्काळ २५% अग्रीम पीक विमा पिंपळगांव काळे महसूल मंडळाला देण्यात यावा. संपूर्ण महसूल मंडळाचे मानवी सर्वे करून २५% अग्रीम पीक विमा मंजूर करा. पर्जन्यमापक यंत्र हे महसूल मंडळाच्या मध्यभागी लावण्यात यावे. विमा कंपनी कडे तक्रार केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात पिक विमा कंपनी कडून सर्वे करण्यात यावे. या सर्व मागण्यांसाठी आज जळगाव जामोद तहसील कार्याला समोर पिंपळगांव काळे महसुल मंडळातील शेतकऱ्यांच्या वतीने उपोषण कर्ते युव नेते प्रकाश विठ्ठलराव भिसे यांच्या नेतृत्वात शेतकरी बांधवांचे बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे त्यावेळी उपोषणकर्ते युवा नेते प्रकाश विठ्ठलराव भिसे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने भेट देत आहेत त्यावेळी वासुदेव दादा चोखंडे, पि.काळे सरपंच शे.हारून,विजय बहादरे, संपत बुंदे, सुपडा मानकर, रतन नाईक, सुनिल बोदडे, विजय सातव, श्रीकृष्ण वानखडे, निलेश वानखडे, सुनील काकडे, संतोष जवरे, गणेश बोदडे, मयूर राऊत, ज्ञानेश्वर कोकाटे, गजानन चोखंडे, गणेश इंगळे, सुपडा बांगर, बालु निकम, भगवान परस्कार, बाळू राऊत,भास्कर वाघमारे, मनोहर पाटील, महेंद्र तायडे, भास्कर भगत, अनेक शेतकरी बांधव येत आहेत.

# मुंब्रा - पनवेल महामार्गावर नावडे फाटा येथे केमिकलने भरलेला टँकर पलटी

## केमिकलमधून धूर आल्याने भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज



**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** मुंब्रा - पनवेल महामार्गावर नावडे फाटा येथे सकाळी २५ मेट्रीक टन हायड्रोजन पेरॉक्साइड ड्रमने भरलेला टँकर पलटी झाला. टँकर पलटी झाल्यानंतर त्यातून धूर येऊ आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.नावडे फाटा येथे महामार्गालगत रयत शिक्षण संस्थेचे प. जो. म्हात्रे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज असल्याने पोलिसांनी तातडीने नावडे फाटा ते रोडपाली जंक्शन या दरम्यानची रस्त्यावरील वाहतूक काही काळ बंद ठेवली.

मुंब्रा-पनवेल महामार्गावरील वाहतूक थेट उड्डाण पुलावरून सुरू होती.टँकर पलटी झाल्यानंतर संबंधित टँकरचा चालक हा टँकरमध्ये अडकल्यामुळे या महामार्गावरील प्रवाशांनी टँकरची काच फोडून चालकाला सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन दलाला बोलावण्यात आले.तळोजा पोलीस ठाणे तळोजा वाहतूक शाखा तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्त्यांवर पसरलेले हायड्रोजन पॅरॉक्साईड रसायनावर पाणी मारून रस्ता स्वच्छ केला.टँकर चालकने दिलेल्या माहितीनुसार कल्याण येथील नॅशनल पॅरॉक्साईड या कंपनीचा माल जेएनपीटी बंदरात घेऊन जात असताना हा अपघात झाला. रस्त्याचा अंदाज न आल्याने वळसा घेत असताना टँकर कलंडल्याचे टँकर चालकाने सांगितले. अग्निशमन दलाचे अधिकारी बी. जी. काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार हायड्रोजन पेरॉक्साइड या रसायनाला आग लागल्यास त्याचा अधिक मोठा भडका होऊ शकतो, तसेच शाळा शेजारी असल्यामुळे दुर्घटना होऊ नये म्हणून शाळेच्या व्यवस्थापनाला संबंधित अपघाताची माहिती देण्यात आल्याचे अग्निशमन अधिकारी काळे यांनी सांगितले.



# पैठण ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथकाकडून घाटीला १ लाखाची औषधी भेट

## पैठण शहर व्यापारी महासंघाचे होतेय कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राज्यात सध्या बहुतांश शासकीय रुग्णालयात औषधींचा तुटवडा असल्याचे सांगण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आपण समाजाचे काही देणे लागतो अशा धर्तीवर पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने आज पैठण येथील शासकीय रुग्णालयात (आरोग्य प्रशिक्षण केंद्र) पॅरासीटेमॉल, सेट्रीझिन, केल्शियम,बी कॉम्प्लेक्स, मेट्रोनिझोल, सलाइन, आय व्ही सेट, कॉटन, कॅथरेटर, ॲमलोडीपीन, डायक्लोजेल, फेरीयम XT, डायक्लो टॅब्लेट अशा 1 लाख रुपयांचे औषधी पैठणचे तहसीलदार श्री सारंग चव्हाण व पैठणचे तहसीलदार संजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय रुग्णालयाचे प्रपाठक डॉ.गौतम सव्वाशे यांच्याकडे सुपुर्द केली. सध्या राज्यात ज्याप्रकारे औषधींचा तुटवडा जाणवत आहे आणि त्यामुळे रुग्णालयात रुग्णांना जो त्रास सहन करावा लागत आहे. त्याची दखल घेत पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया व सचिव बलराम लोळगे यांनी डॉ. किल्लारीकर सर यांना भेटुन शहर व्यापारी महासंघाच्या वतीने काही औषधींची मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी प्रपाठक डॉ. सव्वाशे यांच्याशी चर्चा करून आम्हाला लागणाऱ्या औषधीचे लिस्ट दिली. त्याप्रमाणे आज ह्या औषधी शासकीय रुग्णालय यांना देण्याचे ठरले आणि आज हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार सारंग चव्हाण यांनी सुध्दा पैठण शहर व्यापारी महासंघाणे अशा प्रकारचा एक आगळा वेगळा उपक्रम घेऊन पैठण शहरातील नागरिक आणि व्यापारी जागरूक असून नक्कीच त्यांचे हे कार्य कौतुकास्पद असल्याचे या प्रसंगी सांगितले. त्यानंतर पैठणचे पोलिस निरीक्षक श्री संजय देशमुख यांनी पैठण शहर व्यापारी महासंघाचा हा आजचा उपक्रम हा राज्यातील पहिला उपक्रम असल्याचे म्हंटले आणि नक्कीच आशा प्रकारचे सुरवात पैठण पासून होत असून नक्कीच पुढे अशा कठीण प्रसंगी सर्वच ठिकाणी लोक पुढे येऊन शासनाच्या सोबत राहून असे चांगले उपक्रम राबवतील व सहकार्य करतील अशी भावना व्यक्त केली. सर्वात शेवटी शासकीय रुग्णालयचे डॉ.सव्वाशे आणि डॉ. किल्लारीकर यांनी आजच्या उपक्रमाचे कौतुक करून पैठण शहर व्यापारी महासंघाचे आभार व्यक्त केले.

या प्रसंगी पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, सुनिल नलभे, सचिन लखोटीया, अमोल धस, हार्दिक सराफ, योगेश लोहिया, उमेश तट्टू, सचिन उंडाळे, बाळासाहेब आहेर,लक्ष्मण लबडे,जगदिश लोहिया, सचिन पहाडे, मधुसूदन मुंदडा, राधाकिसन लोहिया, जगदिश नागोरी, राहुल पहाडे, अभिजित बजाज, आनंद लोहिया, सचिन तांदळे, मुकेश पंजवानी आदी व्यापारी उपस्थित होते.

# बनावट कागदपत्रे वैध ठरविणाऱ्यांवर कारवाई करा : आमदार सुधाकर अडबाले

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे बनविणाऱ्या ३२ प्रपत्र धारकांवर मूळ प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, सदर प्रपत्र वैध ठरविणाऱ्या पुनर्वसन कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी तसेच सिटीपीएस मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यांच्यावर तात्काळ चौकशी करून कारवाई करा, असे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी दिले.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. यात प्रकल्पग्रस्त म्हणून काही लोकांनी खोटी कागदपत्रे बनवून नोकऱ्या मिळवल्या. यावर सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंटचे मुख्य संघटक बळीराज धोटे व प्रकल्पग्रस्तांनी तक्रार दाखल केल्यानंतर पुनर्वसन विभागाने चौकशी केली असता १२८ पैकी ७२ प्रपत्र धारकांना अपात्र ठरविण्यात आले. त्यातील ३२ बनावट प्रपत्र धारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. प्रत्यक्षात ज्या विभागाने प्रपत्र वैध ठरवले त्याच विभागाने ३२ प्रपत्र धारकांना अपात्र ठरविले. याचा अर्थ बनावट कागदपत्रे बनवितांना मोठा अर्थ व्यवहार झाला असण्याची दाट शक्यता आहे. यात दलालांची मोठी टोळीही सक्रीय असल्याची माहिती आहे.

या प्रकरणात बनावट कागदपत्रे वैध ठरवणाऱ्या चंद्रपूर पुनर्वसन कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच सिटीपीएस मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न दाखल केला होता. आमदार अडबाले यांनी दाखल केलेल्या प्रश्नावर सीटीपीएस मधील दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचे ऊर्जामंत्री यांनी निवेदन सादर केले. पण पुनर्वसन कार्यालयातील कोणावरही कारवाई करण्यात आली नाही. यामुळे आमदार अडबाले यांनी १० ऑक्टोबर २०२३ रोजी पुनर्वसन व सीटीपीएस अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक लावली.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात गेलेल्या मूळ जमिनधारकास डावलून दलालांमार्फत बनावट कागदपत्रे बनविणारे मोठे रॅकेट सक्रीय आहे. या रॅकेटच्या माध्यमातून अनेकांनी बनावट कागदपत्रे बनवून नोकरी लाटली. प्रत्यक्षात जमीन गेलेल्या अनेकांना अजूनही नोकरी मिळाली नाही.

आज पार पडलेल्या बैठकीत तत्कालिन पुनर्वसन अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी लावण्यासंदर्भाने विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केल्याचे सांगण्यात आले. मूळ प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष असल्याने बनावट कागदपत्रे वैध ठरविणाऱ्या चंद्रपूर पुनर्वसन कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी तसेच सिएसटीपीएसमधील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ चौकशी करून कारवाई करावी तसेच या प्रकरणातील रॅकेटवर सुद्धा कारवाई करावी, असे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी जिल्हाधिकारी यांना दिले.

या बैठकीला अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अतुल जटाळे, सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंटचे मुख्य संघटक बळीराज धोटे, भास्कर सपाट, पप्पू देशमुख, रवी झाडे, आत्माराम देवतळे व सिटीपीएस व पुनर्वसन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लोहा तालुक्यात मुरुमासह वाळू माफियांचा हैदोस

## महसूल विभागाच्या डोळयासमोर दिवसाढवळ्या बिनधास्त वाळूची अवैध वाहतूक

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** तालुक्यात महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून स्थानिक महसूल प्रशासन अपयशी ठरले असून,वाळूची चोरट्या मार्गाने खुलेआम वाहतूक सुरू आहे. वाळूमाफियांवर कारवाई करण्यास व वाळूचोरी रोखण्यात जिल्हाधिकाऱ्यांनीच याकडे लक्ष घालून वाळूमाफियांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. रात्रभर वाळूची वाहतूक सुरू असताना महसूल कर्मचारी व अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

गोदावरी नदीपात्रालगत असलेल्या गावातून दररोज खुलेआम कुठल्याही टिपरवर नंबर नसलेल्या वाहनांतून बिनधास्तपणे वाळूची चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात आहे. वाळूचोरीमुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असून, ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. पहाटे दिवसाढवळ्या वाहनांतून वाळू वाहतूक केली जात असताना स्थानिक महसूल प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करून वाळूमाफियांना अभय देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. वाळू वाहतूक करणारी वाहने रस्त्यावरून भरधाव जात असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची भीती आहे.शहरासह ग्रामीण भागात अनेक नवीन बांधकामे सुरू असून, वाळूमाफियांकडून ठिकठिकाणी वाळूचे साठे करण्यात आले आहेत. वाळूची टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री करून ग्राहकांची लूट केली जात आहे. वाळूमाफियांचे दलाल दिवसभर महसूल कार्यालय परिसरात फिरत असल्यामुळे नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे. सायंकाळी सातपासून सकाळी आठपर्यंत वाळूची वाहतूक बिनधास्त सुरू आहे. वाळूचोरीस आळा घालण्यात अथवा कारवाई करण्यास स्थानिक महसूल प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून



# फुलंब्री येथे मनोज जरांगे यांची सभा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** मराठा समाजासह धनगर समाजाचीही सरकारने अशीच अवस्था केली. आरक्षण नसल्यामुळे मराठ्यांच्या वेदना दिवसेंदिवस वाढत चालल्या असून हे सरकारने लक्षात घ्यावे. वेदनांचा उद्रेक झाला तर सरकारला महागात पडेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ठिकठिकाणी जरांगे पाटील यांच्या सोमवारी सभा झाल्या. फुलंब्री शहरातील सभेत बोलताना ते म्हणाले, 'मराठा आरक्षणासाठी सरकारला चाळीस दिवस दिले. त्यानंतरचा ४१ वा दिवस आपला असणार आहे. कोणत्याही स्थितीत आता आरक्षण घेतल्याशिवाय सरकारची सुटी नाही. त्यामुळे ही एकजूट सुटू देऊ नका. अंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे सरकारने विविध कलमांच्या माध्यमातून आमच्यावर गुन्हे दाखल केले. ते मागे घेण्यास सरकारला भाग पाडू. १४ ऑक्टोबरला अंतरवाली सराटी येथे राज्यस्तरीय सभा होणार आहे. त्यासाठी मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे'. आपल्यात फूट पडू देऊन नका लासूर स्टेशनः उपोषण सुटल्यानंतर मायबाप मराठा समाजासाठी फिरत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळविण्याची ही शेवटची संधी आहे. आपल्यात फूट पडू देऊन नका, असे सांगून अंतरवाली येथील सभेसाठी येण्याचे आवाहन जरांगे यांनी केले. येथील सभेत ते म्हणाले, 'सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यास अनुकूल नाही. मराठा समाजासह धनगर समाजाचीही सरकारने अशीच अवस्था करून ठेवली आहे. सरकार समाजाची एकी फोडण्यासाठी काहीही प्रयत्न करू शकते. त्यामुळे सर्वांनी एकत्र राहण्याची गरज आहे.





# जिल्हास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत पारडीच्या मुलींनी मारली बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सहयोग कॅम्पस विष्णुपूरी नांदेड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२३-२४ च्या खो-खो स्पर्धेमध्ये लोहा तालुक्यातील पारडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या १४ वर्षाखालील मुलींच्या खो-खो संघाने प्रथम क्रमांक पटकावला.सलग चौथ्याही वर्षी चौथ्यांदा जिल्हा विजेता होऊन विभागीय स्तरापर्यंत गरूड झेप घेतली.

जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या खेळाडूंना खो-खो चे जिल्हा क्रीडा संयोजक तथा जिल्हा उप क्रीडा अधिकारी बालाजी शिरशीकर, खो खो असोसिएशनचे जिल्हा सचिव रमेश नांदेडकर, जमदाडे यांच्या हस्ते ट्रॉफी देवून गौरविण्यात आले.

विजयी खेळाडूमध्ये प्रिती डिकळे, खुशी मटके, आरती डिकळे, गायत्री डिकळे, अक्षदा वाघमारे,आरती पवार, समिक्षा कदम, दिव्या गायकवाड, संध्या तेलंग,ऋतूजा पवार, आरती पांचाळ,आरती पवार,संध्या पवार,अक्षरा पांचाळ,लक्ष्मी डिकळे हे खेळाडू खो-खो संघात सहभागी झाले होते.

सदरील यशस्वी संघास क्रीडा शिक्षक तथा शाळेचे मुख्याध्यापक किसवे माधव यांनी अथक परिश्रम घेऊन सलग चौथ्यांदा जिल्हा विजेता होऊन विभाग स्तरापर्यंत झेप घेतली.सतत चौथ्यांदा विभागीय स्तरापर्यंत जाणारी एकमेव जिल्हा परिषदेची शाळा ठरली आहे.

यशस्वी खेळाडूंचे स्वागत गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे,शिक्षण विस्तार अधिकारी टेकाळे सर्जेराव, केंद्र प्रमुख बाबुराव फसमले,सरपंच प्र.संभाजी पवार,प्र.उपसरपंच गोविंद डिकळे,शा. व्य.समितीअध्यक्ष विठ्ठल डिकळे, सचिन गायकवाड, व्यंकट डिकळे,शरद पवार,बाळू पाटील,माधव डिकळे, त्र्यंबक पवार,राजू गायकवाड,शंकर पाटील, सखाराम पाटील, मारोती पवार,कैलाश पवार,विश्वांभर डिकळे यांनी अभिनंदन केले.मार्गदर्शन बालाघाटे डी.पी., देशमुख जी.एल., गंगाखेडकर सी. पी.,कदम जे.ए., इंगोले एस .एस.,कदम आर जी.,गणेश कत्ते, सार्थक पवार,आकाश निमडगे,रवी भाऊ, ओमकार निमडगे,कृष्णा बायस, नंदकिशोर परळीकर ,तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष शिवराज पाटील पवार यांनी विशेष अभिनंदन केले.

# आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून अभ्यास करा : अमोल गर्जे

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** विद्यार्थ्यांनी आपल्या शेतकरी - कष्टकरी आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून अभ्यास करावा, आजपासून पुढील पाच वर्षे कठोर मेहनत, अभ्यासाचे योग्य नियोजन केल्यास तुमचे भविष्य उज्वल होऊ शकते , असे प्रतिपादन पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे यांनी केले . महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष व्याख्यानात बोलत होते.

आज शनिवारी शाळेच्या चाणक्य सांस्कृतीक सभागृहात 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार ' या विषयावर बोलताना त्यांनी पुढे सांगितले की , स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर आपल्याकडे गुणवत्ता असायला हवी , विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध असून पोलीस दलातही आजपासून नियोजन करून तुम्ही अधिकारी बनू शकतात .तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस , मुलींनी स्वतःच्या क्षमता तपासून विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवायला हवे , असेही ते म्हणाले .

प्रारंभी विद्यार्थिनींनी इशस्तवन स्तवन सादर केले . प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती व्ही .व्ही .घोंगडे यांनी केले. यावेळी शाळेतर्फे मान्यवरांचं पुष्पगुच्छ आणि स्नेहवस्त्र देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सौ छायाताई गर्जे , उपमुख्याध्यापिका के. ए. बनकर, ज्येष्ठ शिक्षक बी. एन .जाधव यांच्यासह सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन वर्ग शिक्षक शंकर भामेरे यांनी केले. आभार क्रीडाशिक्षक हरिभाऊ राऊत यांनी मानले.



# बेवारस अवस्थेत फिरणाऱ्या ८० वर्षीय वृद्धाला पोलीस व माणुसकी समूहाने दिला मायेचा निवारा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जातेगाव येथील निराधार अवस्थेत फिरणाऱ्या ८० वर्षीय वयोवृद्ध बाबा नामे विठ्ठल रावजी शेजुळ राहणार हे गेल्या काही दिवसापासुन संभाजीनगर शहरामध्ये वेदांतनगर हद्दीतील बाबा पेट्रोल पंप रेल्वे स्टेशन भागात कोन्हि दिले ते खायचे फुटफाटवर रात्र काढायची सकाळ झाली की भाकरिच्या शोधात फिरायचे अश्या पध्दतीने आपला उदरनिर्वाह भागवीत होते.त्यांनी नीट चालताहि येत नव्हते संपुर्ण शरीर डग.डग हालत होते.

आज रोजी बाबा पेट्रोल पंप महाविर चौक येथे पेट्रोलींग करतांना दामीनी वन पथकानी त्या बाबांना विचारपुस करुन वेदांतनगर पोलीस स्टेशनमध्ये पुढिल कार्यवाही कामी आनुन सोडले असता.वेदांतनगर वरिष्ठ पोलीस निरिक्षक ब्रम्हा गीरी साहेब यांनी नातेवाईकांचा शोध घेतला असता गावतील पोलीस पाटील यांनी सांगितले की जातेगाव येथे त्यांचे घर आहे त्यांना दोन मुली आहेत त्याचे लग्न झाल्यानंतर त्या माहेरी राहतात



सदर वृध्दाची पत्नी मयत आहे.बाकी त्यांचे घरी कोन्हिच नाही अशी माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी हसनाबाद पोलीस स्टेशन हद्दीत मुलगी राहत असल्याचे कळाले असता सदर माहिती वृध्दाची माहिती हसनाबाद पोलीसांना दिली आहे.परंतु अद्यापहि मुलींचा शोध लागलेला नाही परंतु वृध्दाची हेडसाळ होवु नये याकरिता बेवारसांना सांभाळ करणाऱ्या सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे समाजसेवक सुमित पंडित यांच्याशी पोलीस निरिक्षक ब्रम्हा गीरी साहेब यांनी फोनद्वारे संपर्क साधून वृद्धांला त्यांच्या माणुसकी वृद्ध सेवालयामध्ये तात्पुरती राहण्याच्या व्यवस्थेसाठी कळविले असता समाजसेवक सुमित पंडित यांनी वेदांनगर पोस्टेला येऊन सदर वृद्ध आजोबाला प्रथम उपचार करिता शासकीय रुग्णालय घाटी येथे घेऊन प्रथम उपचार करून त्यांच्या जटवाडा रोड येथील माणुसकी वृद्ध सेवालयामध्ये त्यांचे अन्न वस्त्र निवारा याकरिता नातेवाईक सापडेपर्यंत तात्पुरती व्यवस्था केली आहे. जर नातेवाईकांनी सांभाळण्यास नकार दिला तर पुढील पुनर्वसनासाठी माणुसकी समूहाने सदरील वृद्धाची जबाबदारी घेतली आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हा एस गीरी, शासकीय रुग्णालयाचे प्रसाद पांडे सर, उपपोलीस निरिक्षक कैलास जाधव, शारदा लाटे मॅडम, देवकुमार सुर्यवंशी, अँथोनी फ्राशेंस, कासबे मेजर, पोलीस हवलदार वर्षा मुंढे, समाजसेवक सुमित पंडित, माणुसकी वृध्दसेवालयाच्या संचालीका पूजा सुमित पंडित यांनी परिश्रम घेतले.

# स्फोटके आढळून आल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

## एक अटक तर दुसरा फरार : दहशतवाद पथक नांदेड यांची मोठी कारवाई, भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणेशपूर फाट्याजवळ नांदेड येथील दहशतवाद विरोधी पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सोमवारी (दि. ९) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास स्फोटक बाळगल्याप्रकरणी एकास ताब्यात घेतले आहे, तर दुसरा विरोधी एक जण फरार झाला आहे. अटक केलेल्या आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.नांदेड येथील दहशतवाद विरोधी पथकास मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे संबंधित पथकाने नांदेड युनिटचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी चंडेल यांच्या मार्गदर्शनाखालील चारठाणा येथून पाच कि.मी. अंतरावर असलेल्या जिंतूर -जालना महामार्गावरील गणेशपूर फाट्याजवळ बाजीराव खंडोजी घुले ( वय ३७ रा. जांभरून ता. जिंतूर) यास स्फोटक बाळगल्याप्रकरणी ताब्यात घेतले आहे. तर दुसरा एक जण सुदर्शन प्रल्हाद ताठे (रा. बेलुरा ता. जिंतूर) हा घटनास्थळावरून फरार झाला आहे. सदर कारवाईत संबंधित हे जिलेटिन कांडी व डेटोनेटर्स विनापरवाना बाळगतांना दहशतवाद पोलीस पथकास आढळून आले. सदर स्फोटकाची किंमत ६ हजार ८४१ रूपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, सदर प्रकरणी नांदेड युनीटचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी चंडेल यांच्या फिर्यादीवरून दोघा जणांवर चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जिंतूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी पाडुरंग गोफने यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड हे करीत आहेत. सदर स्फोटके चारठाणा पोलिसांनी एका पडिक जमिनीवर नेऊन नष्ट केले असून नष्ट केलेल्या स्फोटाचे तुकडे पोलिसांनी प्रयोग शाळेला तपासणीसाठी पाठविले आहेत. दरम्यान, सदर प्रकरणातील अटक केलेल्या बाजीराव खंडोजी घुले यास चारठाणा पोलिसांनी मंगळवारी (दि. १०) दुपारी जिंतूर न्यायालयासमोर उभे केले असता त्यास न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. फरार अरोपीच्या शोधात पोलीस पथक रवाना लवकरात लवकर या घटनेतील अरोपीस ताब्यात घेऊन यावर गुन्हा दाखल करून न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहेत आसे पोलीस उपनिरीक्षक पोलीस अधिकारी पाडुरंग गोफने यानी सांगितले आहे.



# सोयाबीनवर मोझॅकमुळे शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न झाले पिवळे !

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील सध्या पुन्हा एकदा अस्मानी संकट ओढले असून,ऐन शेंगा भरण्याच्या काळात सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक' रोगाचे संक्रमण आल्याने शेतातील सोयाबीन पिके शेंगा भरण्याअगोदरच पिवळे पडत असून, यामुळे सोयाबीन पिकाला अत्यंत कमी झडती लागण्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे लोहा तालुक्यातील शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले असून शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न 'यलो मोझॅक' नावाच्या सोयाबीनवर आलेल्या रोगामुळे पिवळे पडले असून, शेतकऱ्यांना तात्काळ राज्य शासनाकडून अर्थिक मदत जाहीर होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे .

लोहा तालुक्यामध्ये यावर्षी सुरुवातीला पावसाने चांगली साथ दिल्याने तालुक्यातील सोयाबीन, कपाशी व तुर पिके चांगल्या प्रमाणात डोलू लागली तालुक्यात सुरुवातीच्या पावसानंतर गेल्या दोन महिन्यांपासून सरासरीपेक्षा पाऊस कमी झाल्याने पिकांना पाहिजे तशी झडती मिळणार नसल्याचे अनेक शेतकऱ्यांनी बोलून दाखवले. लोहा तालुक्यामध्ये सोयाबीन पिकाच्या पेरा या वर्षी वाढला असून, गेल्यावर्षी संततधार पावसामुळे पिकाचे अतोनात नुकसान झाले .संततधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन पिके काढता सुद्धा आली नाही.यंदा सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक' या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव सोयाबीन पिकावर आल्याने शेतामधील सोयाबीनचे पिके शेंगा भरण्या अगोदरच पिवळे पडत आहेत. यावर्षी शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकापासून मोठी अपेक्षा केली असून हिरवे स्वप्न रंगवले होते.परंतु सोयाबीन शेंगा भरण्या अगोदरच 'यलो मोझॅक' नावाच्या रोगाने शेतातील उभे सोयाबीन पिवळे पडायला लागले आहे .

# बोधेगाव खुर्द ग्रा.पं.चा भ्रष्ट कारभार

## सरपंच - ग्रामसेवकाच्या चौकशी पत्राला केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज




**फुलंब्री :** तालुक्यातील बोधेगाव खुर्द येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी काम न करतात उचलले लाखोचे बिले उचलून सुद्धा या भ्रष्ट कारभाराची चौकशी पुन्हा व्हावी असे दैनिक आधुनिक केसरी २२ सप्टेंबर च्या अंकात वृत्त प्रकाशित होताच . गट विकास अधिकारी पंचायत समिती फुलंब्री यांनी त्रिसदस्यीय समिती स्थापन करून परत चौकशी करण्याचे आदेश दिले परंतु या आदेशाला चौकशी अधिकार्यांनी केराची टोपली दाखवली आहे. बोधेगाव खुर्द येथील ग्रामसेवक सरपंचांनी मनमानी करत न केलेले कामाची बिले उचलले असून या संदर्भात तक्रार करूनही चौकशी अधिकाऱ्यांनी कोणताही दस्तावेज तपासतात व ग्रामसभेचा ठराव न पाहता सदर प्रकरण आगाची घडलेच नाही असा अहवाल देऊन प्रकरण दडपण्याचा प्रताप केला गेला होता परंतु हा प्रकार उघड झाला .याबाबत वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी बोधेगाव ग्रामस्थांनी केली आणि तसे दैनिक आधुनिक केसरी च्या २२ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झाली. या वृत्ताची गट विकास अधिकारी संजय गायकवाड यांनी दखल घेत दिण् २४/०९/२०२३ रोजी व्ही एस राठोड सहाय्यक गट विकास अधिकारी, पवार यु बीउपअभियंता (बांधकम), उपविभाग जि प छत्रपती संभाजीनगर, व एस आर म्हस्के, विस्तार अधिकारी पंचायत समिती फुलंब्री या त्रिसदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आली आहे . या बाबत भ्रष्ट्राचाराचा चौकशीचा अहवाल प्रस्तुत प्रकरणी वस्तुनिष्ठ तात्रिंक त्रिस्तरीय चौकशी करुन सदर अहवाल ३ दिवसात सादर करण्यात यावा. असा आदेश दिला होता. मात्र १५ दिवस झाले परंतु आजपर्यंत सदर चौकशी समिती इकडे फिरकलीच नाही. राजु विठठल मोटे रा. बोधेगाव खु ता. फुलंब्री यांचा अर्ज दिनांक ०२/०८/२०२३ नुसार ग्रामपंचायत बोधंगाव खु - येथील प्रस्तुत प्रकरणी वस्तुनिष्ठ तात्रिंक त्रिस्तरीय चौकशी करुन अहवाल ३ दिवसात सादर करण्यात यावा, असे २५ सप्टेंबर च्या पत्रात म्हटले होते. बोधेगाव खुर्द तालुका फुलंब्री येथील ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांनी मनमानी करत न केलेला कामाची बिले उचलल्याने संबंधितावर योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात यावी असा तक्रार अर्ज देऊन आठ महिने उलटूनही कोणतीच कारवाई झाली नव्हती याबाबत राजू विठ्ठल मोठे यांनी जानेवारी 2023 रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी फुलंब्री यांच्याकडे लेखी तक्रार देऊन संबंधितावर योग्य ती कारवाईची मागणी केली होती. या पूर्वी चौकशी अधिकारी तथा विस्तार अधिकारी पवार यांनी चौकशी न करता व तक्रारदाराला विश्वासात न घेता ग्रामसेवक व सरपंच यांना क्लिन चीट देत प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला गेल्याचे दैनिक आधुनिक केसरीने छापले होते आता गटविकास अधिकारी यांनी म त्रिस्तरीय चौकशी समितीला पत्र दिल परंतु १५ दिवस झाले परंतु चौकशी समिती नेमली खरी परंतु त्यांनी ही गटविकास अधिकारी यांच्या पत्राला केराची टोपली दाखवली आहे . तरी कर्तव्यात कसुर करणाऱ्या संबंधितांवर कार्यवाही करण्यात याववीत व सरपंच - ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी राजु मोटे यांनी केली आहे .

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# अजगराला जीवनदान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील चिरनेर येथील खारपाटील वेअर हाऊस मधील भोमालगत असलेल्या अगरवाल कंपनीच्या आवारात नऊ फुटाचा तसेच 18 किलो वजनाचा अजगर आढळून आला असता तेथील कर्मचाऱ्यांनी फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) संस्थेच्या हेल्पलाईनवर कॉल केला असता संस्थेचे सर्पमित्र राजेश पाटील हे सदर ठिकाणी जाऊन त्या अजगराचा रेस्क्यू केला. त्यासोबत तिथे उपस्थित असलेल्या कामगारांना सापाची माहिती दिली.

दिवसेंदिवस कमी होत चाललेली जंगले व त्यामुळे धोक्यात आलेले वन्यजीव नागरी वस्तीत दिसू लागले आहेत, असा कुठला जीव आपल्या घरपरिसरात दिसला तर त्याला न मारता संस्थेच्या हेल्पलाईन वर कॉल करून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करा असे आवाहन राजेश पाटील यांनी केले.

# साताऱ्याच्या सभेतून विचारांची मेजवानी

## आंबेडकरी नेत्यांच्या सभा अन् पुस्तकाचे स्टॉल

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**सातारा :** महाराष्ट्रात आंबेडकरी नेत्यांच्या सभा किंवा आंबेडकरी चळवळीचे कार्यक्रम कुठे ही असले तरी त्या कार्यक्रम स्थळी विचारांची चळवळ गतिमान करणाऱ्या पुस्तकांचा स्टॉल असतोच असतो.

अशावेळी पुस्तके घेण्यासाठी झुंबडच पाहायला मिळते. साताऱ्यात शनिवार दि.७ ऑक्टोबर रोजी अशीच काहीशी परिस्थिती दिसून आली. संविधान जनजागृती विचारमंच यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ॲड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांची सभा संपन्न झाली. सभा ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी जमलेली होती. विशेष म्हणजे याच गर्दीतून पुस्तकाचा स्टॉल ही दिसून आला. विचारांची मेजवानी देणारे हे पुस्तकाचे स्टॉल व या स्टॉलवरून पुस्तके घेण्यासाठी उपस्थितांनी सुद्धा स्टॉल भवती मोठी गर्दी केली होती.कुणी एक पुस्तक घेत होते तर कुणी चार पाच पुस्तके घेऊन खरेदी करत होते.सभेतील विचार मंथना सोबतच पुस्तकातील विचार सुद्धा सोबत घेऊन जाण्यासाठी आंबेडकरी अनुयायी सदैव तयार असतात.वाचाल तर वाचाल हा शिक्षण मंत्र उपयोगाचा ठरत असतो.वाचनाने ज्ञान तर मिळतेच शिवाय विचार करण्याची क्षमता अजून चिकित्सक बनत असते.

समाज व समाजातील वास्तव परिस्थितीचा आढावा देणाऱ्या अशा अनेक पुस्तकांचा संच पुढे असतो की जी पुस्तके अजूनही लोकांपर्यंत पोहचलेली नाहीत.अशा पुस्तकांना लोकांपर्यंत घेऊन जाण्याचे काम एक पुस्तकाचा स्टॉलच करत असतो.पुस्तक वाचण्याचा छंदच नव्हे तर कोणती पुस्तके आपल्या वाचनात असायला हवीत.यासाठी अशा पुस्तकांचे स्टॉल हे आंबेडकरी कार्यक्रमात दिसतात.स्टॉलवर ठेवण्यात आलेल्या पुस्तकांची नावे पाहताच क्षणी त्याच पुस्तकांना लोकांचा स्पर्श होऊन जातो. त्या पुस्तकातील पाने चाळता चाळता पुस्तकच घेण्याची तीव्र इच्छा बनत असते.

पुस्तकातून सर्वकाही जाणून घेण्यासाठी अनेकांची धडपड निर्माण होत असते. पुस्तकांवर जीवापाड प्रेम करणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पहिली ते चौथी पर्यंत ज्या साताऱ्याच्या प्रतापसिंह हायस्कूल मध्ये शिक्षण झाले त्याच परिसरात त्यांच्या नातूची सभा संपन्न होत असताना पुस्तकप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुस्तक रुपी घेण्यासाठी अनेकांचे हात स्वतःच्या खिशातून पैसे बाहेर काढण्यासाठी खिशात जात होते.अन जे पुस्तक घ्यायचे होते. ते पुस्तक घेतले जात होते.आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या त्या शैक्षणिक विचारांचे पालन करण्याचा प्रयत्न होत असतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्या काळी म्हणायचे की,जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी आणि एक रुपयाचं पुस्तक घ्या कारण भाकरी तुम्हाला जगण्यास मदत करेल आणि पुस्तक तुम्हाला कसं जगायचं हे शिकवेल. हा विचार तंतोतत जपला जात आहे. आज प्रचंड प्रमाणात पुस्तक विकत घेणारा हा समूह पाहायला मिळत असतो. परंतु पुस्तकातील विचार वाचलं जाणं सुद्धा तितकेच गरजेचे आहे. पुस्तकातील विचाराने प्रेरित होणारी चळवळ गतिमान करण्याचे कामच असे पुस्तक स्टॉल करत असतात.महाराष्ट्रात दादरची चैत्यभूमी असेल, नागपुरची दीक्षाभूमी असेल,महाडचा चवदार तळ असेल किंवा भीमा कोरेगावचा विजय स्तंभ असेल यासारख्या अनेक ठिकाणी जिथे जिथे आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने जमतो. अशा प्रत्येक ठिकाणी असे पुस्तकांचे स्टॉल लोकांच्या मस्तकाची चिकित्सक व जागृती निर्माण करणारी भूमिका बजावत असतात.आंबेडकरी चळवळीला गतिमान करणाऱ्या अशा पुस्तकांचे स्टॉलच खऱ्या व वास्तववादी परिस्थितीशी झगडणाऱ्या विचारांची मेजवानी देऊन जात असतात.सातारच्या सभेने संविधान जन जागृतीचा उद्देश ठेवून इथे संविधान टिकायला हवे,संविधानाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा राबली पाहिजे.संविधानाचे उल्लंघन थांबले पाहिजे यांसारखे अनेक मुद्दे मांडले गेले.सभेतून प्रकाश आंबेडकरां सह इतर वक्तत्यांनी सुद्धा समाज सुधारक,महापुरुष यांचा विचार मांडला.जी जबाबदारी या वक्त्यांनी बजावन्याचे काम केले तीच भूमिका पुस्तकाच्या स्टॉलने पुस्तके घरा घरात पोहचवून केलेली आहे.असेच म्हणावे लागेल.जे पुस्तक ज्या ठिकाणी घेतलं जातं त्या ठिकाणची आठवण सुद्धा पुस्तकाच्या रुपाने कायम स्मरणात राहत असते.साताऱ्याच्या सभेतून घेतलेले पुस्तक आणि त्या पुस्तकातील विचार नक्कीच या सभेच्या निमित्ताने लोकांना विचार जागृती करण्याचे बळ या पुस्तक वाचनातून देत राहील.वाचाल तर वाचाल हा शिक्षण मंत्र आजही वाचन संस्कृतीला टिकवून आहे.ही वाचन संस्कृती जोपर्यंत असे विचार पेरणारे व विचारांची मेजवानी देणारे पुस्तकांचे स्टॉल असतील तोपर्यंत पुस्तक बध्द झालेले विचार लोकांना अशा माध्यमातून भेटत राहतील.

# डेंग्यूचा प्रादुर्भाव; जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यात डेंग्यूच्या साथीचा प्रादुर्भाव वाढला असून, डेंग्यूच्या साथीवर तत्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी आरोग्य प्रशासनाने पाहणी करीत शर्थीचे प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिल्या. जिल्ह्यातील डेंग्यू साथीच्या प्रादुर्भावाचा आढावा जिल्हाधिकार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, महापालिका आयुक्त डॉ. विद्या गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी काही सूचना केल्या. घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नका. डबक्यांच्या स्वरूपात जमा झालेले पाणी प्रवाहित करा अथवा त्यावर माती टाकून खड्डे बुजवावेत. ही कार्यवाही ग्रामपंचायत, नगरपालिका , महापालिका प्रशासनाद्वारे करावी.

# कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालयात विश्वकोशचे प्रा. डॉ. राजा दीक्षित यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याची प्रेरणा निर्माण व्हावी म्हणून भारतरत्न डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस म्हणजे 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात येणार आहे. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. आर.एन. शिंदे हे यांच्या अध्यक्षतेखाली 'वाचन संस्कृतीची जोपासना 'या विषयावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. राजा दीक्षित यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ.शामकांत देवरे, कॉलेज कमिटी चेअरमन धनराज राजमल जैन व कर्म.आ.मा. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.के.डी.कदम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे संयोजन मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के, प्रा.एल.जे.गवळी व विश्वकोश कार्यालयाचे विद्याव्यासंगी सहायक संतोष गेडाम व रविंद्र घोडराज आदिनी केले आहे.

# बोडखा गंधेश्वर ग्रापं सरपंचा विरुध्द अविश्वास ठराव दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा गंधेश्वर येथील ग्रामपंचायत च्या सरपंचा विरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आले असून ता. १७ रोजी तहसीलदार यांच्या अध्यक्ष



# सत्तेपेक्षा समाजकारण हे माझं व्यसन : सुभाष जेधे

## नारी शक्ती सन्मानार्थ पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आपण समाजाचं एक देणं लागतो.आपण आपल्या पद्धतीने समाज कार्य करत राहिले पाहिजे. सत्ता येते जाते. परंतु त्याच्यापेक्षा सामाजिक कार्यात आपल्याला आपली
इथली जागा कुणी हलवू शकत नाही.जे आहे ते आपल्यापाशी सतत राहत असते.सत्तेपेक्षा समाजकारण हे माझं व्यसन असून त्या व्यसना प्रमाणे मी काम करत आहे. आपल्या निम शहरी भागाने अख्ख्या महाराष्ट्राला धमाका ग्रुपच्या कार्यक्रमांनी वेड लावलं आहे. हे कौतुकास्पद आहे. कौतुकाची थाप माझ्या सारख्या लहान समाज कार्यकर्त्याकडून एक उत्तरदायित्व
म्हणून महिलांचा सन्मान करण्याचं निश्चित झालं. पैसे महत्वाचे नाहीत.पैसा आज आहे उद्या नाही. ऊन, सावली सारखा पैशाचा खेळ आहे. माझ्याकडे जे काही आहे.त्यातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे.असे प्रतिपादन सुभाष जेधे यांनी केले.

निरा-शिवतक्रार, ता.पुरंदर येथे भारतीय संस्कृतीची परंपरा जपणाऱ्या नारी शक्तीचा सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन सुभाष जेधे यांच्याकडून करण्यात आले होते. यावेळी महिला सन्मान सोहळा घेण्यामागची पार्श्वभूमी सांगत असताना सुभाष जेधे प्रास्ताविक पर मनोगतातून बोलत होते. या सोहळ्यातून धमाका ग्रुपच्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच गौरी सजावटीत विशेष कामगिरी करणाऱ्या महिलांना सुद्धा प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महिला उद्योजक म्हणून सुवर्णा कांबळे यांचा विशेष सन्मान केला. यावेळी निरा-शिवतक्रारच्या सरपंच तेजश्री काकडे, जेष्ठ छायाचित्रकार प्रकाश शिंदे, पोलीस उपनिरीक्षक नवसारे सर, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सदस्य संदीप धायगुडे, अनुजा शहा, चंदा लाहोटी, वैजयंती शहा, दादा गायकवाड, अमोल साबळे,



विजय धायगुडे, महेश जेधे व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी सुद्धा आपली मनोगते व्यक्त करत धमाका ग्रुपच्या महिलांचे आणि सुभाष जेधे यांचे विशेष कौतुक केले. जेष्ठ छायाचित्रकार प्रकाश शिंदे यांचा ही विशेष सन्मान करण्यात आला.गौरी सजावट स्पर्धेत संगीता शिंदे, तृप्ती पवार, शीतल मईड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले. त्यांचा ही सन्मान करण्यात आला.धमाका ग्रुपने मंगळागौरच्या निमित्ताने "बाई पण भारी देवा" ही थीम राबविली होती.य थीमचे निरा-शिवतक्रार सह पंचक्रोशीतूनच नव्हे तर महाराष्ट्रातील विविध भागातून कौतुक झाले होते. धमाका ग्रुपच्या सर्व सदस्य महिलांचा विशेष गौरव करण्यात आला. धमाका ग्रुपच्या तनुजा शहा यांच्या सह त्यांचा संपूर्ण ग्रुप शारदा अग्रवाल, पुष्पा सोनी, मिनल निगडे, मंगल आगवणे, वैजयंती शहा, अनुजा शहा, हेमलता पवार, चंदा लाहोटी, सुनिता भादेकर, वनिता जैन, शैला शहा, वंदना चव्हाण, स्मिता दोशी, संगिता जैन, कस्तुर पटेल, पूजा शहा, मनिषा ओसवाल, भाग्यश्री शहा, सायली मेहता, कल्पना पटेल, सेजल कोठाडिया, माधुरी शहा, दीपा शहा, नीना शहा, रेखा पटेल, शोभा शेट्टी, वैजू भोसले, वर्षा शहा, सुजाता गांधी, मोहिनी भिसे, चंदा थोपटे, जयश्री जैन, रुपा शहा, नेहा शहा या सर्वांचे कौतुक करण्यात आले. धमाका ग्रुपचे कौतुक केल्याबद्दल तनुजा शहा व ग्रुप यांच्याकडून सुभाष जेधे व उपस्थित मान्यवर या सर्वांना धन्यवाद दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा शहा, नेहा शहा, मोहिनी भिसे यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार सुभाष जेधे यांनी मानले.



# 1 नोव्हेंबर रोजी कंत्राटी वीज कामगारांचा मंत्रालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** राज्यातील महावितरण, महापारेषण, व महानिर्मिती कंपनीतील नियमित मंजूर रिक्त पदांवर मागील 15 ते 20 वर्षेपासून फक्त 14 हजार, 15 हजार रूपये प्रतिमाहे काम करत असलेल्या अनुभवी व कुशल वीज कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित रोजंदारी पद्धतीने वयाच्या 60 वर्षा पर्यंत जॉब सिक्युरिटी देऊन सेवेत सामावून घ्यावे अथवा समान काम समान वेतन द्यावे या प्रलंबित मागण्यांसाठी बुधवार दि. 1 नोव्हेंबर 2023 रोजी मंत्रालयावर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) संघटनेच्या पुणे येथील भारतीय मजदूर संघाच्या कार्यालयात 7 व 8 ऑक्टोबर 2023 रोजी झालेल्या केंद्रीय कार्यकारिणी बैठकीत झाला. या बैठकीसाठी राज्यातील 28 जिल्ह्याचे अध्यक्ष व सचिव उपस्थित होते.

संविधानिक शासकीय देय रकमेचा अपहार करणाऱ्या व कामगारांचे आर्थिक शोषण करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. अन्याय ग्रस्त कामगारांना कामावर घ्यावे व प्रलंबित धोरणात्मक निर्णय होईपर्यंत या कामगारांना 20,000 पगार वाढ, सुरक्षा साधने, मेडिक्लेम, प्रशिक्षण, गणवेश, रेनकोट, बूट, गणवेश धुलाई भत्ता, मोबाईल व पेट्रोल भत्ता, ओव्हर टाईम,जादा सुट्या मिळाव्यात अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

उर्जा खात्याचे मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघटना पदाधिकारी यांची बैठक घेतल्यास या समस्यांवर नक्कीच तोडगा निघेल असा विश्वास महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघांचे (संलग्न भारतीय मजदूर संघ) प्रदेश अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केला आहे.

# सेझग्रस्त शेतकऱ्यांनो तुमचे होईल ते आमचे होईल या भ्रमात राहु नका : ॲड. दत्तात्रेय नवाळे

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सन २००५ मधे उरण, पेण व पनवेल तालुक्यातील ४५ गावामधे विशेष आर्थीक क्षेत्र स्थापन्याकरीता महाराष्ट्र शेतजमिन अधिनीयम १९४८ चे कलम ६३ अनुसार व तेव्हाचे विकास आयुक्त (उद्योग) यांचे दिं. १६ जुन २००५ चे परवानगी नुसार जमिन मिळकती मे मुंबई इनटीग्रेट एस. ई.झेड लि. कंपनीला खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली होती. सदरची कंपनी १५ वर्षामधे सदरच्या जमीन मिळकतीवर प्रकल्प उभा करण्यास असमर्थ ठरली तर सदरची जमिन मिळकत ज्या शेतकऱ्याकडुन विकत घेतली आहे त्या शेतकऱ्यांना त्यांनी मागणी केल्यास सदर जमिन मिळकत कंपनीकडुन मुळ किंमतीस परत विकत घेण्याचा अधीकार राहील.अशा प्रकारे कंपनीने खरेदी केलेली जमिन मिळकत १५ वर्षात न वापरल्यामुळे मार्च २०२२ पासुन ५२३ शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांजकडे कंपनीने खरेदी केलेल्या जमिन मिळकती परत करण्याकरता उरण, पेण, पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यां तर्फे चौकशी अर्ज दाखल केले. त्यावर सुनावणी होऊन फेब्रुवारी २०२३ मधे प्रकरण अंतीम आदेशाकरीता ठेवण्यात आले.

आत्ता जिल्हाधीकारी अलीबाग मार्फत फक्त ५२३ शेतकऱ्यांच्याच शेत जमिनी परत देणे बाबत कागदोपत्री पुरावे संबंधीत तलाठी व तहसीलदार यांज कडुन मागवीले आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी



जमिन परत मिळणेकरीता अर्ज दाखल केले आहेत त्यांच्याच बाबतीत सदरची कार्यवाही चालू झाली आहे. त्यामुळे "तुमचे होईल तेच आमचे होईल" अशी भाषा करणारे शेतकरी पुढे पस्तावतील त्याची नोंद घ्यावी. आत्ता अलिबाग - विरार कॉरीडॉर करीता सेझ कंपनीचे नावाने जमिन मिळकती असल्यामुळे कंपनीला नोटीसा निघाल्या आहेत व इतरही प्रकल्पाला सेझला विकलेल्या जमिनी भूसंपादीत होणार आहेत. तरी बाकीच्या २००० शेतकऱ्यांनी व्यक्तीशः अर्ज दाखल करावे व सेझने घेतलेल्या जमिनी परत मिळविण्याचे प्रयत्न करावेत. अन्यथा पश्चातापाची वेळ येईल असे ऍड.दत्तात्रेय नवाळे यांनी दिलेल्या प्रसीद्धी पत्रकामधे म्हटले आहे.

# जागतिक हास्य दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी जागतिक स्मितहास्य दिवस म्हणजेच वर्ल्ड स्माइल डे साजरा केला जातो. हसण्याचे अनेक फायदे आहेत. हसण्याने माणूस फक्त दीर्घायुषीच होत नाही तर ह्यविकार , रक्तदाबाचा धोखाही कमी होतो. आजच्या धावपळीच्या काळात प्रत्येकजण ताण-तणावात असतो. अशावेळी एक स्मितहास्य एखाद्याचा सर्व ताण कमी करते. असे म्हणतात की, एक स्मितहास्य एखाद्या व्यक्तीचा दिवस चांगला बनवू शकते. हसण्याचे अनेक फायदे आहेत, म्हणूनच नेहमी हसा आणि हसवत राहा असे सांगितले जाते.

# वर्षाभरापासून लाभार्थी धान्यापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे ममुराबाद येथील एका लाभार्थीची निवड करण्यात आली खरी परंतु सहा महिन्यांपासून प्रक्रियाचा नावा खाली निव्वळ चालढकल सुरु असुण लाभार्थी धान्यापासून वंचित आहे तर धान्य मिळेल या भरवाशावर तिचा छळ सुरु आहे.

ममुराबाद येथील रुख्या अफसर शेख हिचे २२एपीएल रेशन कार्डातून तिची निवड करण्यात आली खरी. परंतु गत सहा महिन्यांपासून प्रक्रियाचा नावा खाली निव्वळ चालढकल सुरु आहे.व तीला रेशनिंग मधील धान्य मिळत नाही. गावात एक रेशनिंग दुकान असुण एपीएल २२पीएच११०व इतर ०५एकुण१४७रेशनिंग कार्डधारक आहे.यात २२एपीएल कार्डा मधून घर शेत नाही गरिब कुटुंब असल्याने रुख्या शेखची निवड तलाठी यांनी करुन पेपर प्रक्रिया करून तातडीने रेशनिंग धान्य सुरु होईल असे आश्वासन दिले सहा महिने झाले मात्र चालढकल सुरु आहे व लाभार्थी धान्यापासून वंचित आहे व ती धान्याची प्रतिक्षा करत आहे. जिल्हा पुरवठा विभागाने यात लक्ष घालून तालुक्यात पुरवठा विभागात हे काय प्रकार सुरु आहे. याची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून व लाभार्थी कडून होत आहे.

